अहवाल क्रमांक : १८२

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# तिसरा अहवाल

(सदर अहवाल दिनांक मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत

# तिसरा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा धमाजी गजबे, वि.स.स.

(१६) डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर गजानन जोरगेवार, वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.प.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

## पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

*श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

**श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

***श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा ' समिती प्रमुख ' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा तिसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्याउलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे /उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ सप्टेंबर, २०१८ रोजी भेट देऊन श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २४ जुलै, २०१९ व दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी जिल्हा परिषद, कोल्हापूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग, श्री. अनिल डिग्रीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, श्री. पी. के. मिराजे, सहायक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, डॉ. विजय भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, श्री. भा. ज. गाडेकर, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ. वसंत माने, अवर सचिव, ग्रामविकास, डॉ. एस. व्ही. गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग, श्री. र. पु. इंगोले, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, श्री. अ. म. पिंपरकर, श. श्रे. १ पर्यावरण विभाग, श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. रविकांत अडसुळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र. वि.), श्री. राजेंद्र भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी, श्रीमती आशा उबाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री. मनिष पवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, डॉ. वाय. आर. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. विनोद पवार, पशुसंवर्धन अधिकारी, श्री. समीर व्याघ्रांबरे, प्र. उद्यान अधिकारी यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२१.

**संजय रायमुलकर**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| १ | एक | उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्कार वितरणाबाबत (सन २०१३-१४). | ३.२२/२ | १ |
| २ | दोन | ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेच्या थकीत पाणीपट्टी समायोजनाबाबत (सन २०१३-१४). | ३.२४/११ | ६ |
| ३ | तीन | कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना सौर पथदिवे पुरविणे योजनेतील अनियमितता (सन २०१३-१४). | ३.२५/४४ | ९ |
| ४ | चार | प्राथमिक शाळांसाठी ड्युअल डेस्क खरेदीबाबत (सन २०१३-१४) | ३.८६/३ | १२ |
| ५ | पाच | सन २०१३-२०१४ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०१३-१४). | ३.११९३(९१)/३ | १७ |
| ६ | सहा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत (सन २०१३-१४). | ५.७२(२)/१४<br>५.७२(२)/१५ | २० |
| ७ | सात | सर्वसाधारण शिफारशी | | २४ |
| | | **परिशिष्ट**<br>समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | २७ |

प्रकरण एक

# जिल्हा परिषद, कोल्हापूर

## उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्कार वितरणाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२२/२ (सन २०१३-१४)**

जिल्हा परिषद स्वीय निधीमधून सन २००४-२००५ पासून उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांचेकरिता यशवंत पुरस्कार योजना राबविण्यात येते. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात सन २००९-२०१० ते २०१२-२०१३ या चार वर्षाकरिता एकाच वेळी उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांची निवड समितीने बैठक घेऊन निवड करून सदर पुरस्कार बक्षिस व वितरण समारंभावर रक्कम रुपये २९,८३,७९०/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) प्रत्येक वर्षांचे प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून त्या त्या वर्षांत मागणी न करता चार वर्षांचे पुरस्काराकरीता एकाच वेळी एकाच आर्थिक वर्षांत मागणी केली आहे. सन २०१२-२०१३ वर्षाकरिता पन्हाळा गटाकडून केवळ एक प्रस्ताव प्राप्त झाल्यामुळे ग्रामपंचायतीची उदासिनता दिसून येते.

(२) सदर कार्यक्रम हा पूर्वनियोजित होता. याकामी कर्मचा-यांच्या नांवे खर्च भागविणेसाठी रक्कम रुपये ४ लाख जिल्हा परिषद स्वीय निधीतून अग्रीम दिले त्याचे समायोजन झाले. त्यातून एक लाखापेक्षा जादा ग्राम सजावट, पदके, भोजन याकामी खर्च केला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास संकिर्ण २०१०/२७५ प्र.क्र १७२/पंरा-७, दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ प्रमाणे ज्या वस्तू व सेवा पुरवण्यासाठी शासन दर करार नसल्यास रुपये एक लाखापेक्षा वरील खरेदी ई- टेंडरिंगच्या माध्यमातून करणे बंधनकारक असताना तशी कार्यवाही केली नाही.

(३) सत्कार समारंभाच्यावेळी भोजनाकरिता दरपत्रके मागवून भोजनावर रक्कम रुपये १,९८,०३०/- खर्च केली आहे. कोणत्या प्राधिकारात सदर रक्कम खर्च केली. सदरचा खर्च जिल्हा परिषद अधिकार क्षेत्राच्या बाहेरील असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम १०१ प्रमाणे आयुक्तांची मंजुरी घेणेत आली नाही. भोजन प्रति ताट दर निश्चित न करता दरपत्रके मागणी केली त्यामुळे प्राप्त दर योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही. तसेच कार्यक्रमास उपस्थितांचे हजेरीपत्रक लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्काराचे प्रत्येक वर्षाकरीता प्रस्ताव गटाकडून त्या त्या वर्षात मागणी करणेत आलेले होते.

पन्हाळा गटाकडील सन २००९-२०१० ते २०११-२०१२ पर्यंत वर्षनिहाय दोन-दोन प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु सन २०१२-२०१३ मधील एकच प्रस्ताव प्राप्त झालेला होता.

| अ.क्र. | बाब | रक्कम अदा रुपये |
|---|---|---|
| १ | मंडप व मंडप डेकोरेशन | ४८,४४८/- |
| २ | म्युझीक सिस्टीम | ३३,३१८/- |
| ३ | स्टेज डेकोरेशन | ४१,५७३/- |
| ४ | खुर्ची | १६,२४२/- |
| ५ | प्रमाणपत्र | ४७,३५४/- |
| ६ | फेटे | १६,८००/- |
| ७ | शाली | ९००/- |
| ८ | प्लॅस्टिक फाईल | ६१२/- |
| ९ | नारळ | २२५/- |
| १० | निवेदक | १०००/- |
| ११ | पाणी (बाटली) | ३६०/- |

(२) सदरच्या कार्यक्रमाकरीता वरील बाबींसाठी स्थानिक बाजारपेठेतून दरपत्रके मागवून खर्च करणेत आलेला आहे. प्राप्त निविदांपैकी कमी दराची निविदा मंजूर करणेत आलेली आहे. सदर बाबींचा खर्च हा रक्कम रुपये ५०,०००/- असलेने ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील क्र. संकिर्ण २०१०/२७५/प्र.क.१७२/पंरा-७, दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार रक्कम रुपये ५०,०००/- पेक्षा अधिक खर्च नसलेने ई-टेंडरिंग करणेत आलेले नाही.

(३) सदरच्या योजनेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १०० मधील अनुसूची मधील संकिर्ण ११८ नुसार स्वनिधीतून तरतूद करून सदरचा खर्च केलेला आहे. तसेच भोजन ताट दर निश्चित करून दर पत्रके मागणी केलेली आहे.

सदरच्या कार्यक्रमास उपस्थितांची हजेरीपत्रके उपलब्ध आहेत. तरी वस्तुस्थितीचे अवलोकन करण्यात येऊन सदरचा खुलासा मान्य करणेत यावा.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, प्रति वर्षी पुरस्कार देण्याचा जिल्हा परिषदेचा हेतू काय आहे, एकाच वर्षी मागील तीन वर्षाचे पुरस्कार देताना जिल्हा परिषदेचा हेतू साध्य झाला आहे काय, मंडप व मंडप डेकोरेशन म्युझिकल सिस्टीम, स्टेज डेकोरेशन व खुर्ची हा एकाच बाबीखाली होणारा खर्च असताना वेगवेगळा का दाखविला, या सर्व बाबींसाठी निविदा मागवून स्पर्धात्मक दर घेता आले नसते काय, असल्यास ते का घेण्यात आले नाहीत.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रत्येक वर्षी अशा प्रकारचे नियमित पुरस्कार द्यावयास पाहिजे होते. परंतु या ठिकाणी चार वर्षाचे पुरस्कार एकाच वेळी देण्यात आलेले आहेत. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २००९-१०, २०११-१२ मध्ये यासाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू अनुपालन अहवाल हा सन २०१३-१४ चा आहे. या चार वर्षाचा खर्च एकाच वर्षात करण्यासाठी जिल्हा परिषदेने मंजुरी दिली होती काय ? या कार्यक्रमासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात आर्थिक तरतूद करण्यात आलेली होती काय?

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, पुरस्कार वितरण झालेले नव्हते. परंतु त्यासाठी तरतूद करण्यात आलेली होती. यावर समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, या पुरस्कारासाठी तरतूद करण्यात आली होती तर दरवर्षी पुरस्काराचे वितरण का करण्यात आले नाही. सदरहू विषय जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला होता काय, यासाठी दरवर्षी मंजुरी घेण्यात येत असेल तर त्या पुरस्कारांचे वितरण का करण्यात आलेले नाही. या पुरस्काराचा निधी अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत, सन २००९-१० चा लेखा अहवाल पंचायत समितीच्या सभागृहाला सादर करण्यात आलेला आहे काय, त्या आर्थिक वर्षाचे लेखे सादर करण्यात आलेले आहेत काय? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, त्या आर्थिक वर्षाचे लेखे सादर करण्यात आले होते. तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी माहिती दिली की, या पुरस्कारासाठी प्रत्येक वर्षी तरतूद करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे यासाठी दरवर्षी प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प फेब्रुवारी महिन्यामध्ये मंजूर होतो. दरवर्षी ही योजना जिल्हा परिषदेने मंजूर केलेली आहे. त्या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव मागविण्याची आवश्यकता नव्हती काय? चार वर्षे तरतूद केली. परंतु पुरस्कार देण्याबाबतचे प्रस्ताव आले नाहीत. यामुळे सन २००९-१० मधील तो निधी खर्च झालेला नाही. एखाद्या शीर्षावरील रक्कम अखर्चित राहू नये म्हणून आपण पुर्नविनियोजन करतो. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती घेऊन समितीला अवगत करावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सन २००९-२०१० मध्ये रक्कम अखर्चित राहत होती तर ती रक्कम दुस-या लेखा शीर्षावर वळवावयास पाहिजे होती आणि सन २०१०-२०११ मध्ये नवीन तरतूद करावयास पाहिजे होती. सन २०१०-२०११ मध्ये रक्कम अखर्चित राहत होती तर जिल्हा परिषदेस पुर्नविनियोजन करून दुस-या लेखाशीर्षावर वळती करता येत होती. हा जिल्हा परिषदेचा निधी होता, हे खाते प्रमुखांना का सुचले नाही, ही बाब जिल्हा परिषद सभागृहाच्या लक्षात का आणून देत नाही, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी सर्व विभागाच्या खाते प्रमुखांकडून जमाखर्च संकलित करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्थसंकल्प मंजुरीसाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर तो जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीसाठी पाठवावयाचा आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. खाते प्रमुख लेखे सादर करतात त्यावर कोणी आक्षेप घेत नाहीत.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, त्या त्या वर्षात प्रस्ताव कमी आले होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडे जेवढे प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यांना पुरस्कार का दिले नाही ? समितीला दिशाभूल करणारी माहिती देऊ नये. जे लेखा आक्षेप येतात त्याबाबत करण्यात आलेले स्पष्टीकरण जिल्हा परिषद सदस्यांना किंवा सर्व साधारणसभेमध्ये अवगत करण्यात येत नाही काय, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेच्या मंजुरीने उत्तरे दिली जातात.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ही उत्तरे ठेवण्यात आली नाहीत. आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी तीन वेळा संधी देण्यात येते. ही बाब विषय समिती समोर किंवा सर्वसाधारणसभेमध्ये ठेवली जाते त्यावर संबंधितांना मत नोंदवावयाचे असेल तर ते मत नोंदवू शकतात. आक्षेपाची पूर्तता करण्यासाठी तीन वेळा संधी देऊनही त्याची पूर्तता न केल्यामुळे हा मुद्दा समितीसमोर आला आहे. याबाबत विषय समिती किंवा सर्व साधारणसभेमध्ये माहिती दिली असेल तर ती केव्हा दिली, या ठिकाणी शासनाच्या नियमावलीचे पालन केलेले नाही असे दिसून येते. वेळीच पुरस्कार न दिल्यामुळे ग्रामपंचायत आणि सरपंच यांच्यावर अन्याय झालेला आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सन २००४-०५ मधील जिल्हा परिषदेची स्व:निधीची योजना होती. सन २०१० मध्ये निकषामध्ये बदल करण्यात आले त्यामध्ये पोलिसांकडून चारित्र्याचा दाखला घेणे वगैरे बाबी त्यामध्ये होत्या. एकूण २०० गुणांकन होते त्यापैकी कमीत कमी १०० गुण ग्रामपंचायतीला मिळणे आवश्यक होते.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याला खाते प्रमुखांकडून आढावा घेतला पाहिजे. वित्त समितीमध्ये त्यावर चर्चा झाली पाहिजे. ज्या योजनांचे प्रस्ताव आले असतील किंवा का आले नाहीत त्याबाबत चर्चा झाली पाहिजे. सर्व जिल्हा परिषदांमध्ये अर्थ समिती आहे परंतु त्यामध्ये अशाप्रकारची चर्चा होत नाही, त्यामध्ये आढावा घेतला जात नाही. तीन-तीन, चार-चार वर्षे योजनेवर पैसे खर्च न होणे योग्य नाही. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी सुधारित बजेट संकलित करताना मार्गदर्शक सूचना दिल्या पाहिजेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विषय समितीमध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. एखाद्या शीर्षावर पुनर्विनियोजन करावयाचे असले तर तसे सांगावे. पण असे कधी होत नाही. हे सर्व मांडण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. नियमानुसार खर्च होतो की नाही, अर्थसंकल्पाप्रमाणे प्रस्ताव येतात की नाही, विषय समितीच्या ठरावाची अंमलबजावणी होते की नाही याकडे खाते प्रमुख लक्ष देतात की नाही हे सर्व पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. अर्थ समित्यांपुढे वार्षिक लेखे ठेवणे आवश्यक आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये वार्षिक लेखे अर्थ समितीसमोर आले पाहिजेत आणि सप्टेंबर महिन्यात होणा-या सर्वसाधारण सभेपुढे ते ठेवले पाहिजेत.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, निधीची तरतूद असताना पुरस्कार का देण्यात आले नाही. यावर तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, सन २०११-२०१२ पासून ते कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत होते. सन २००९ -२०१० ते २०१२-२०१३ या चार वर्षाचे पुरस्कार देण्यात आले. सन २००४-२००५ पासून ही योजना राबविण्यात येते. गट विकास अधिकारी यांना नावे देण्यासाठी १७ वेळा स्मरणपत्र पाठविली होती. त्याशिवाय सन २००९-२०१० मध्ये लोकसभेच्या निवडणुका होत्या. सन २०१०-२०११ मध्ये विधानसभेच्या आणि सन २०११-२०१२ मध्ये पंचायत समितीच्या निवडणुका होत्या. जिल्हा परिषदेने प्रस्ताव मागविले होते.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, माहे ऑक्टोबर, २००९ मध्ये विधानसभेची आचारसंहिता संपली होती. आपण उर्वरित सहा महिन्यात काहीच केले नाही. माहे एप्रिल, २०१४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या. सन २०१३ मध्ये काय केले. यावर तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, प्रस्ताव प्राप्त होण्यासाठी सरपंचांचे दाखले लागतात. पोलीस अधीक्षकांऐवजी पोलीस निरीक्षकांचे दाखले घेतले. यावर समितीने विचारणा केली की, सदस्यांच्या चारित्र्याचे दाखले मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने मागितले होते काय, यावर तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी होकारार्थी उत्तर दिले.

यावर समितीने नाराजी व्यक्त करत विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांचेकरिता यशवंत पुरस्कार देण्याची योजना होती. त्या संदर्भात सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या वर्षात त्यांना पुरस्कारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. पुरस्कारासाठी निधीची तरतूद असताना देखील त्यांना पुरस्कार देण्यात आलेले नाहीत. तसेच ज्यांची नावे आली त्यांना देखील पुरस्कार देण्यात आले नाहीत. त्यांना पुरस्कारापासून वंचित ठेवलेले आहे. समितीने विचारलेल्या प्रश्नांना अधिका-यांकडून सुसंगत उत्तरे मिळाली नाहीत. मिळालेला निधी खर्च का होत नाही, त्या संदर्भातील प्रस्ताव का येत नाही याकडे तत्कालिन मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी लक्ष दिलेले नाही. निधीची तरतूद असताना उत्कृष्ट ग्रामपंचायत आणि सरपंच यांना पुरस्कारापासून वंचित ठेवलेले आहे आणि ते योग्य नाही. अनेक गोष्टींबाबत जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली जात नाही, त्यांना अनभिज्ञ ठेवले जाते असे दिसते. या ठिकाणी सरपंचांना पुरस्कारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. याबाबत सखोल चौकशी करावी आणि पुरस्कार देण्यामध्ये ज्यांनी दिरंगाई केलेली आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा वस्तुनिष्ठ अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांचेकरीता यशवंत पुरस्कार देण्याची योजना होती. त्यासंदर्भात सन २००९-२०१० ते सन २०१३-२०१४ या वर्षात उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना पुरस्कारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास पुरस्कार देण्यासाठी दिरंगाई केल्याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषद, कोल्हापूर कडून सन २००४-२००५ पासून जिल्हा परिषद स्वनिधीतून उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्कार योजना राबविली जाते. सन २०१०-२०११ (कामकाज वर्ष सन २००९-२०१०) मध्ये सदर योजनेतील निकष बदलणेत आलेले होते. त्यामुळे सदर वर्षात प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून वेळेत सादर केलेले नाहीत. तसेच सन २०११-२०१२ ते सन २०१३-२०१४ मध्ये वेळोवेळी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. ज्या ज्या वर्षात ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव वेळेत सादर केलेले नाहीत. सन २०१०-२०११ (कामकाज वर्ष सन २००९-२०१०) ते सन २०१२-२०१३ (कामकाज वर्ष सन २०११-२०१२) पर्यंतचे ७८ ग्रामपंचायतींची यशवंत ग्रामपंचायत पुरस्कारासाठी व ३६ सरपंचांची यशवंत सरपंच पुरस्कारासाठी निवड दिनांक १६ मे, २०१३ रोजी करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१३-२०१४ (कामकाज वर्ष सन २०१२-२०१३) मधील पुरस्काराची निवड दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ रोजी त्यावेळेस २६ ग्रामपंचायतींची यशवंत ग्रामपंचायत पुरस्कारासाठी व १२ सरपंच यांची यशवंत सरपंच पुरस्कारासाठी निवड करणेत आलेली आहे. सदरच्या निवड झालेल्या सन २०१०-२०११ (कामकाज वर्ष सन २००९-२०१०) ते सन २०१३-२०१४ (कामकाज वर्ष सन २०१२-२०१३) सर्व पुरस्काराचे वितरण सन २०१३-२०१४ मध्ये करणेत आलेले आहे. त्यामुळे कोणत्याही ग्रामपंचायत व सरपंच यांना पुरस्कारापासून वंचित ठेवणेत आलेले नाही.

सदर बाबतीत कागदपत्रांची पडताळणी केली असता ग्रामपंचायत स्तरावरुन विहीत कालावधीत परिपूर्ण प्रस्ताव वेळेत प्राप्त झाले नसलेने व तत्कालीन परिस्थतीमुळे पुरस्कार वितरण करणेस विलंब झालेला आहे.

सन २०१०-२०११ (कामकाज वर्ष सन २००९-२०१०) ते सन २०१३-२०१४ (कामकाज वर्ष सन २०१२-२०१३) या वर्षाचे पुरस्कार वितरण सन २०१३-२०१४ मध्ये केलेले आहे. ज्या-त्या वर्षातील निवडलेल्या सर्व ग्रामपंचायतींना व सरपंच यांना पुरस्कार वितरण केलेले आहे. त्यामुळे कोणत्याही ग्रामपंचायतीस व सरपंच यांना पुरस्कारापासून वंचित ठेवणेत आलेले नाही. तरी हा खुलासा मान्य व्हावा ही विनंती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्कारापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. या बाबत चौकशी करुन पुरस्कार वितरण करण्यास दिरंगाई करणा-यांवर कारवाई करुन कारवाईचा अहवाल सादर करण्याबाबत सांगितले होते. या अनुषंगाने काय कारवाई करण्यात आली.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सन २००९-१० ते सन २०१३-१४ या कालावधीत उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार प्रदान करण्यात न आल्यामुळे ग्रामपंचायतींवर अन्याय झाला, असा मुद्दा उपस्थित झाला होता. परंतु सन २००९-१० या वर्षात सदरहू पुरस्कारासाठी कोणताही प्रस्ताव आला नव्हता. परंतु त्या नंतरच्या दोन-तीन वर्षांमध्ये मात्र प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यानुसार साधारणतः ७३ ग्रामपंचायतींना पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. यशवंत पुरस्कार योजनेचे रुपांतर आता स्मार्ट व्हीलेज योजनेमध्ये झालेले आहे. स्मार्ट व्हीलेज योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यात येतात.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद स्वनिधीमधून सन २००४-२००५ या वर्षापासून उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांचेकरीता यशवंत पुरस्कार योजना राबविण्यात येते. कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात सन २००९-२०१० ते सन २०१२-२०१३ या चार वर्षाकरीता एकाच वेळी उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांची निवड समितीने बैठक घेऊन निवड करुन सदर पुरस्कार व बक्षिस वितरण समारंभावर रक्कम रुपये २९,८३,७९०/- एवढा खर्च करण्यात आला असून याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत :—

सन २००९ ते २०१३ या चार वर्षाचे पुरस्कार एकाच आर्थिक वर्षात मागणी केली आहे. सन २०१२-२०१३ वर्षाकरीता पन्हाळा गटाकडून केवळ एक प्रस्ताव प्राप्त झाला. दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार ज्या वस्तू व सेवा पुरवण्यासाठी शासन दर करार नसल्यास रुपये एक लाखापेक्षा जास्त खरेदी ई-टेंडरींगच्या माध्यमातून करणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. सत्कार समारंभावेळी भोजनावर रुपये १,९८,०३०/- एवढी रक्कम खर्च केली आहे. सदर खर्च जिल्हा परिषद अधिकारी क्षेत्रातील बाहेरील असल्याने आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक होते. तसेच भोजन दर निश्चित न करता दरपत्रके मागणी केली त्यामुळे प्राप्त दर योग्य असल्याचे पडताळणी करता आली नाही. तसेच कार्यक्रमासाठी उपस्थितांचे हजेरी पत्रक लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्काराचे प्रत्येक वर्षाकरीता प्रस्ताव गटाकडून त्या त्या वर्षात मागणी करण्यात आले होते. फक्त पन्हाळा गटाकडील सन २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ पर्यंत वर्षनिहाय दोन-दोन प्रस्ताव सादर करण्यात आले व सन २०१२-२०१३ मधील एकच प्रस्ताव प्राप्त झालेला होता. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये ५०,०००/- पेक्षा अधिक खर्च नसल्यामुळे ई-टेंडरींग करणेत आलेले नाही. भोजन दर निश्चित करुन दरपत्रके मागणी केलेली आहे व कार्यक्रमासाठी उपस्थितांची हजेरीपत्रके उपलब्ध आहेत.

उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, सन २००९ ते २०१३ या प्रत्येक वर्षाचे नियमित पुरस्कार द्यावयास पाहिजे होते. तथापि, याठिकाणी उपरोक्त चार वर्षाचे उत्कृष्ट ग्रामपंचायत व सरपंच यांना यशवंत पुरस्काराचे वितरण एकाच वेळी करण्यात आलेले आहे. सन २००९-२०१० मध्ये रक्कम अखर्चित राहत असल्यास सदर रक्कम दुस-या लेखाशीर्षावर वळती करता आली असती. कारण उक्त निधी जिल्हा परिषदेचा होता, ही बाब जिल्हा परिषदेच्या लक्षात आणून देणे आवश्यक होते. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी सर्व विभागाच्या खाते प्रमुखांकडून जमाखर्च संकलित करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्थसंकल्प मंजुरीसाठी द्यावयाचा असतो. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीसाठी पाठवावयाचा असतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी लक्ष देणे आवश्यक होते. तसेच खाते प्रमुखांनी लेखे सादर करतेवेळी कोणतेही आक्षेप घेतले नाहीत ही बाब समितीस अनाकलनीय व आश्चर्यकारक वाटते त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**लेखापरिक्षकांनी घेतलेल्या उपरोक्त लेखा आक्षेपाची पूर्तता करण्यासाठी तीन वेळा संधी देऊनही जिल्हा परिषद प्रशासनाने त्याची पूर्तता न केल्यामुळे ही बाब समितीसमोर उपस्थित झाली आहे. तसेच शासनाच्या नियमावलीचे देखील पालन झाल्याचे याठिकाणी दिसून येत नाही. यशवंत पुरस्कारासाठी निधीची तरतूद असताना देखील जिल्हा परिषदेने वेळीच पुरस्कार वितरित केले नाहीत. संबंधित ७८ ग्रामपंचायतींची व ३६ सरपंचांची अनुक्रमे यशवंत ग्रामपंचायत पुरस्कारासाठी व यशवंत सरपंच पुरस्कारासाठी दिनांक १६ मे, २०१३ रोजी निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी खर्चाच्या नियोजनाच्या संबंधात नियोजन विभागाने दिलेल्या सुचनांचे पालन झालेले नाही. सबब, राज्यामध्ये यापुढे उत्कृष्ट ग्रामपंचायतींना व सरपंचांना जिल्हा परिषदेकडून मिळणा-या पुरस्काराचे वितरण विलंबाने होऊ नये यासाठी चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ग्रामविकास विभागाने दोन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

## ग्रामपंचायत पाणी पुरवठा योजनेच्या थकीत पाणीपट्टी समायोजनाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२४/११ (सन २०१३-१४)**

पंचायत समिती, शिरोळ यांनी ग्रामपंचायतीना देय मुद्रांक शुल्क अनुदान रक्कम रुपये ६६,२३,३१३/- रक्कमेतून ग्रामपंचायत कडील थकित नळ पाणी पुरवठा रक्कम रुपये १०,६०,३५८/- वसूल करुन खाते क्रमांक ४ मध्ये दिनांक ३० मार्च, २०१४ रोजी जमा केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) थकीत रक्कम रुपये १,३८,५२,४२३/- पैकी किती रक्कम समायोजित झाली याबाबत ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

(२) याबाबतची नोंदवही अपूर्ण आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक १८ जून, २०१९ चे आदेशानुसार सन २००९-२०१० व पुढील थकीत पाणीपट्टी ग्रामपंचायतींनी पाटबंधारे खात्यास भरल्याचे प्रमाणपत्र न घेता ग्रामपंचायतींना अनुदान अदा केलेले आहे.

(४) ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क रक्कम रुपये ५४,४०,६७५/-, सरपंच मानधन रक्कम रुपये २,४१,९१२/-, सदस्य बैठक भत्ता रक्कम रुपये १४,२८५/- कर्मचारी किमान वेतन रक्कम रुपये ३७,३९,८७४/- व यात्रा कर रक्कम रुपये ८८,५६०/- इतके अनुदान प्राप्त झाल्याबाबत नमूना नं. ७ ची ग्रामपंचायतीकडून पावती घेतली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) थकीत रक्कम रुपये १,३८,५२,४२३/- इतक्या रक्कमेपैकी ग्रामपंचायतींना देय मुद्रांक शुल्क व इतर अनुदानातून मार्च, २०१४ अखेर रक्कम रुपये १९,४६,०८२/- इतके अनुदान वसूल केलेले आहे. माहे मार्च, २०१४ ते माहे मार्च, २०१८ अखेर रक्कम रुपये १,१९,२७,१९५/- इतकी रक्कम देय अनुदानातून वसूल करून जिल्हा परिषद स्वनिधी मध्ये जमा केली आहे. उर्वरीत रक्कम रुपये १९,२५,२२८/- पुढील देय अनुदान रक्कमेतून वसूल करणेची दक्षता घेत आहोत. त्याचप्रमाणे थकित रक्कम व समायोजित केलेल्या रक्कमेचा ताळमेळ घेतलेला आहे.

(२) थकबाकी संदर्भातील नियोजन नोंदवहीतील नोंदी पूर्ण करुन घेतल्या आहेत.

(३) ग्रामपंचायतींना देय होणारे अनुदान थेट ग्रामपंचायतींना अदा न करता पंचायत समिती स्तरावर वसूल करुनच जिल्हा परिषद स्वनिधी मध्ये जमा केलेले आहे. यापुढे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय ग्रामपंचायतींना थेट अनुदान अदा होणार नाही. तसेच गटस्तरावर पाटबंधारे खातेची वसुली नसलेबाबत प्रमाणपत्र घेऊनच अनुदान अदा केले जाईल.

(४) ग्रामपंचायतींना देय मुद्रांक शुल्क अनुदान, सरपंच मानधन, सदस्य भत्ता, कर्मचारी किमान वेतन, यात्रा कर इ. अनुदान ग्रामपंचायत स्तरावर अदा केले असून ग्रामपंचायतींना सदरचे अनुदान प्राप्त झालेबाबत नमूना नं. ७ मधील पावत्या उपलब्ध करुन घेतल्या आहेत.

तरी वरीलप्रमाणे खुलासा मान्य करण्यात यावा.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाटबंधारे खात्याची थकित पाणीपट्टी ग्रामपंचायतींना देय अनुदानातून कोणत्या नियमानुसार वसूल केली ? ग्रामपंचायतींनी पाणीपट्टी वसूल केली आहे काय ? याबाबत ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी काय कार्यवाही केली आहे, ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदान न मिळाल्याने गावाच्या विकास कामावर परिणाम झाला आहे किंवा कसे तसेच सदर नळ योजना प्रादेशिक आहे की स्वतंत्र योजना आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, नदीतून गावाला पाणी सोडण्यासाठी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाने योजना केली होती. तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी अधिक माहिती देत विशद केले की, ग्रामपंचायतीची स्वतंत्र योजना होती. पाणीपट्टीची वसुली पाटबंधारे विभागाकडून करावयाची होती. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, थोडक्यात शासनाची पाणीपट्टी त्यातून वसूल केली. ग्रामपंचायतींनी नदीतून पाणी उपसा केला की पाटबंधारे विभाग त्याला आकार घेते. ती भरली नाही म्हणून मुद्रांक शुल्काच्या रक्कमेतून वसुली केली.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, या योजनेला जिल्हा परिषदेची मंजूरी आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी विदित केले की, " ग्रामपंचायतीकडून पाटबंधारे महामंडळाला देय असलेल्या पाणीपट्टीची थकबाकी जिल्हाधिकारी/जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीला देय असलेल्या रक्कमेतून वसूल करण्याबाबत " उप सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक ३ जून, २००४ रोजीचे पत्र आलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, पाणीपट्टीची थकबाकी ग्रामपंचायतीला देय असलेल्या रकमेतून वसूल करण्याबाबत जिल्हा परिषदेची मंजुरी घेतली होती काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, यासंदर्भात मंत्रालय पातळीवर बैठक झाली, त्या बैठकीमध्ये सूचना दिल्या आहेत. पाणीपट्टी लागू होण्यापूर्वी ग्रामपंचायत ठराव देते की, ग्रामपंचायत पाणीपट्टी भरणार आहे. ग्रामपंचायतीने पाणीपट्टी भरली नाही तर जिल्हा परिषद कारवाई करणार आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी असे मत व्यक्त केले की, विभागाच्या सचिवांनी दिलेल्या आदेशानंतर ते कितपत अंमलात आणावेत किंवा अंमलात आणू नयेत यासंबंधी कनिष्ठ अधिका-यांना वरिष्ठांचे आदेश आल्यानंतर त्यांना अडचणीचे होते.

पुढे समितीने असे मत व्यक्त केले की, तो ग्रामसभेचा अधिकार होता. कारण मुद्रांक शुल्काचा निधी हा सामान्य निधीमध्ये जमा होतो. तो वार्षिक लेखा जेव्हा ग्रामसभा मंजूर करते तेव्हा तो अधिकार ग्रामसभेचा असतो. तो निधी कोठे खर्च करायचा हा ग्रामसभेचा अधिकार डावलला आहे आणि थेट पैसे कपात केले आहेत. कारण ग्रामपंचायतीच्या स्वनिधीमध्ये जितका निधी जमा होतो त्याच्या खर्चाचे नियोजन ग्रामसभेने करायचे असते. पण या ठिकाणी ग्रामसभेने मान्यता न घेताच हा निधी परस्पर काढून घेतला आहे. ग्रामसभेचे अधिकार अशा प्रकारे का काढून घेण्यात आले आहेत. एक परिपत्रक काढायचे आणि त्या ग्रामसभेचे अधिकार काढून घ्यायचे. विधानसभेच्या सभागृहात हे अधिकार काढून घेण्याचे ठरले आहे काय, कारण त्या ग्रामसभेला हे अधिकार विधानसभेच्या सभागृहाने दिलेले आहेत. या ठिकाणी ग्रामसभेची मान्यता न घेता परस्पर त्यांचा निधी काढून घेता व ग्रामसभेला घटनेने दिलेल्या अधिकारांचा अवमान करीत आहात. हा विषय संबंधित विषय समितीसमोर ठेवला पाहिजे. विषय समितीने तो नाकारला तर आपल्याला ठराव करायचा अधिकार आहे. तसे न करता परस्पर निर्णय घेत आहात. जिल्हा परिषद सुद्धा घटनात्मक पद्धतीने काम करु शकते. ती सुद्धा स्वायत्त संस्था आहे आणि असे असताना या ठिकाणी सरळ सरळ घटनेचे उल्लंघन झाले आहे.

पाणीपट्टीची थकबाकी ग्रामसभेच्या मंजुरीशिवाय थेट अदा कशी करण्यात आली हा विषय आहे. या बाबतीत पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीमध्ये मुद्रांक शुल्कातून अनुदान मिळते ती रक्कम थेट भरण्याचे काम झालेले आहे. वास्तविक पाहता तो निधी सामान्य निधीच्या लेखाशीर्षामध्ये जमा होत असताना त्याच्या खर्चाबाबत आमसभेमध्ये खर्चाबाबत निर्णय घेणे आवश्यक असताना त्याला बगल देण्याचे काम मोठ्या प्रमाणात झाले आहे. हा विषय राज्यात सर्वत्रच आहे. या ठिकाणी सुद्धा तो विषय आला आहे. त्यामुळे या बाबतीत संपूर्ण चौकशी करावी, अहवाल तयार करावा, अशा पद्धतीने आपल्याला परस्पर तसे करता येणार नाही, म्हणून संपूर्ण माहितीचा अहवाल समितीला १ महिन्याच्या आत सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामपंचायत पाणीपुरवठा योजनेच्या थकीत पाणीपट्टी समायोजनाबाबत पाणीपट्टीची थकबाकी ग्रामसभेच्या मंजुरीशिवाय थेट अदा करण्यात आली आहे. तसेच पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीमध्ये मुद्रांक शुल्कातून अनुदान मिळते ती रक्कम थेट भरणा करण्यात आलेली आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन १९९९-२००० ते सन २००६-२००७ पर्यंत जिल्ह्यातील एकूण ५७२ ग्रामपंचायतींनी पाटबंधारे विभागास पाणीपट्टी उपकराची रक्कम भरणा केलेली नसल्याने जिल्हा परिषदेस मिळणा-या महसूल मधून रक्कम रुपये ९,४३,३४,०००/- पाटबंधारे विभागाने समायोजन करुन घेतलेला होता.

सन १९९९-२००० ते सन २००६-२००७ अखेर संबंधित ग्रामपंचायतींना देय असणा-या मुद्रांक शुल्क अनुदान व इतर महसुली अनुदानातून माहे मार्च, २०१८ अखेर ८,२४,०६,८०५/- इतकी रक्कम वसूल करून जिल्हा परिषद स्वनिधीमध्ये जमा करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत रक्कम रुपये १,१९,२७,१९५/- संबंधित ग्रामपंचायतीकडून वसुलीची कार्यवाही चालू आहे.

सदर वसुलीची कार्यवाही ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक दिनांक ३ जून, २००४ नुसार करण्यात आलेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून चौकशी करणेत आली आहे. चौकशी अहवालानुसार शासन परिपत्रकानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात आली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायत पाणी पुरवठा योजनेच्या थकित पाणीपट्टीच्या समायोजनाबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाच्या आधारे शासन परिपत्रकानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात आली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, शिरोळ यांनी ग्रामपंचायतींना देय मुद्रांक शुल्क अनुदान रक्कम रुपये ६६,२३,३१३/- या रक्कमेतून ग्रामपंचायतकडील थकीत नळ पाणी पुरवठा रक्कम रुपये १०,६०,३५८/- वसूल करुन दिनांक ३० मार्च, २०१४ रोजी जमा केलेली आहे. याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

थकित रक्कम रुपये १,३८,५२,४२३/- पैकी किती रक्कम समायोजित झाली याबाबत ताळमेळ घेणे आवश्यक असून याबाबतची नोंदवही अपूर्ण आहे. थकित पाणीपट्टी ग्रामपंचायतींनी पाटबंधारे खात्यास भरल्याचे प्रमाणपत्र न घेता ग्रामपंचायतींना अनुदान अदा केलेले आहे. ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क रक्कम रुपये ५४,४०,६७५/-, सरपंच मानधन रक्कम रुपये २,४१,९१२/-, सदस्य बैठक भत्ता रक्कम रुपये १४,२८५/-, कर्मचारी किमान वेतन रक्कम रुपये ३७,३९,८७४/- व यात्रा कर रक्कम रुपये ८८,५६०/- इतके अनुदान प्राप्त झालेबाबत नमुना नंबर ७ ची ग्रामपंचायतीकडून पावती घेतलेली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशानुसार थकित रक्कम रुपये १,३८,५२,४२३/- पैकी ग्रामपंचातींना देय मुद्रांक शुल्क व इतर अनुदानातून माहे मार्च, २०१४ अखेर रक्कम रुपये १९,४६,०८२/- तसेच माहे मार्च, २०१८ अखेर रक्कम रुपये १,१९,२७,१९५/- इतकी रक्कम देय अनुदानातून वसूल करुन जिल्हा परिषद स्वनिधीमध्ये जमा केली आहे. उर्वरित रक्कम रुपये १९,२५,२२८/- पुढील देय अनुदान रक्कमेतून वसूल करणेची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच थकीत रक्कम व समायोजित रक्कमेचा ताळमेळ घेतलेला आहे. थकबाकी संदर्भातील नियोजन नोंदवहीतील नोंदी पूर्ण केल्या आहेत. थकीत पाणीपट्टी ग्रामपंचायतींनी पाटबंधारे खात्यास भरल्याचे प्रमाणपत्र घेऊनच अनुदान अदा केले जाईल. तसेच ग्रामपंचायतींना अनुदान प्राप्त झालेबाबत नमुना क्रमांक ७ मधील पावत्या उपलब्ध करून घेतल्याचे नमूद केले आहे. सदर खुलाशाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, शिरोळ अंतर्गत नदीतून गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाने योजना केली होती. ही ग्रामपंचायतीची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना होती. सदर योजनेच्या पाणीपट्टीची वसुली पाटबंधारे विभागाकडून करावयाची होती, थोडक्यात शासनाची पाणीपट्टी वसुल करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीकडून पाटबंधारे महामंडळाला देय असलेल्या पाणीपट्टीची थकबाकी जिल्हाधिकारी/ जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीला देय असलेल्या रकमेतून वसूल करण्याबाबत ग्रामविकास विभागाने दिनांक ३ जून, २००४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तथापि, ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची थकीत रक्कम ग्रामपंचायतीला देय असलेल्या रक्कमेतून वसूल करावयाची असल्यास ग्रामसभेची मंजूरी आवश्यक आहे. कारण मुद्रांक शुल्काचा निधी हा सामान्य निधीमध्ये जमा होतो तो वार्षिक लेखा जेव्हा ग्रामसभा मंजूर करते तेव्हा तो अधिकार ग्रामसभेचा असतो. सदर निधी कोणत्या बाबींवर खर्च करावयाचा हा ग्रामसभेचा अधिकारच जिल्हा परिषदेने डावलला असल्याचे दिसून येते. कारण ग्रामपंचायतीच्या स्वनिधीमध्ये जितका निधी जमा होतो त्या खर्चाचे नियोजन ग्रामसभेने करावयाचे असते. प्रस्तुत प्रकरणी ग्रामसभेची मान्यता नसतानाही निधी परस्पर काढून घेतलेला आहे. **यासंदर्भात ग्रामविकास विभागाच्या दिनांक ३ जून, २००४ रोजीच्या परिपत्रकानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली असली तरी ग्रामसभेच्या मंजुरीविना पाटबंधारे विभागाच्या पाणीपट्टीची थकीत वसुली करण्यात आल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. राज्यात बहुतांश ठिकाणी अशाप्रकारे वसुलीची कार्यवाही करण्यात आली आहे, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या थकीत पाणीपट्टी वसुली व इतर वसुली संदर्भात सुस्पष्टता व सुसूत्रता आणण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत स्वयंस्पष्ट व सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात यावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

## कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना सौर पथदिवे पुरविणे योजनेतील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.२५/४४ (सन २०१३-१४)**

ग्रामीण भागाला पर्यावरण संतुलित मुलभूत सुविधा उपलब्ध करून भारनियमन टाळून विना व्यत्यय अपारंपारिक स्त्रोतातून नियमित वीज पुरवठा व्हावा या करीता कमी लोकसंख्या असलेल्या रस्त्यावर सौर पथदिवे खांब बसविण्यासाठी सन २०११-२०१२ करिता २१२ ग्रामपंचायतीसाठी प्रति ग्रामपंचायत ३ सौर पथदिवे या प्रमाणे ६३६ सन २०१२-२०१३ करिता ३०८ ग्रामपंचायतीसाठी ९२४ सौर पथदिवे असे एकूण १६६० दिवे बसविणेचे उद्दीष्ट होते. राज्य शासन हिस्सा रक्कम रुपये १,४९,७६.०००/- व ग्रामपंचायत हिस्सा रक्कम रुपये ६५,९१,०००/- एकूण रक्कम रुपये २,१५,६७,०००/- मक्तेदारास अदा केले आहे. केंद्र हिस्सा रक्कम रुपये ९८,३५,५००/- जिल्हा परिषदेस प्राप्त झालेले नाही. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.सौऊदि-२०१३/ प्र.क्र.१५/पंरा-६ दिनांक ३० मार्च, २०१३ परिच्छेद ३ मेडा यांचे दिनांक १७ जुलै, २०१२ रोजी चा दरकरार, अट क्रं.७ नुसार सौरपथ दिव्यांची ५ वर्षे देखभाल दुरुस्ती (MC) करणे बंधनकारक आहे. सदर कालावधीत दर तिमाही उभारणी सौर पथदिवे यांना मक्तेदार यांनी भेटी देऊन भेट अथवा दुरुस्ती रजिस्टरला नोंद घेणे आवश्यक असतांना नोंदवही ठेवलेली नाही. उभारणी केलेल्या १६१० पथदिव्यांबाबतचा तिमाही अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्र. सौऊदि-२०१३/ प्र.क्र.१५/पंरा-६ दिनांक ३० मार्च, २०१३ परिच्छेद ७ प्रमाणे ग्रामपंचायत हिस्सा जिल्हा परिषद निधीत भरणा करणे आवश्यक होते. तथापि, जिल्हा परिषदेने रक्कम ११ ब ठेव संकीर्ण सदरी ठेवलेले आहे. ग्रामपंचायत हिस्सा रक्कम रुपये ६५,९१,०००/- जमा होणे आवश्यक होते, परंतु रक्कम रुपये ७३,२६,१५०/- जमा आहे. ज्यादा रक्कम रुपये ७,३५,१५०/- बाबत योग्य तो मेळ घेवून संबंधित ग्रामपंचायतीना रक्कम परत करणे आवश्यक आहे.

(३) कंत्राटदाराकडून आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम १९४ (C) प्रमाणे २% आयकर रक्कम रुपये ४,३१,३४०/- वसूल करून शासनास भरणा करणे आवश्यक होते त्यापैकी रक्कम रुपये १,२७,८७२/- इतका आयकर वसूल करण्यात आला आहे. उर्वरित रक्कम रुपये ३,०३,४६८/- आयकर वसूल करून भरणा करणे आवश्यक आहे.

(४) मेडा दरकरार बिल प्रदान अट १४५ (II) प्रमाणे ९०% रक्कम सौरदिप बसविल्यानंतर व उर्वरित १०% रक्कम प्रगती अहवाल व राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी घेवून मक्तेदारास रक्कम अदा करणे आवश्यक आहे.

(५) मेडा दरकरार अट क्र. १२ (ड) प्रमाणे पथदिप स्पेसिफीकेशन प्रमाणे बसविल्याबाबत रँडम तपासणी करणेबाबत कळविले होते. त्यानुसार १२ गटांपैकी केवळ ४ गटातील ६४ ग्रामपंचायत दिवे तपासणी केली आहे. ८ गटातील सौरदिप तपासणी झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.सौऊदि-२०१३/ प्र.क्र.१५/पंरा-६ दिनांक ३० मार्च, २०१३ परिच्छेद ३ मेडा यांचे दिनांक १७ जुलै, २०१२ चा दरकरार अट क्र.७ नुसार सौरपथ दिव्यांची ५ वर्षे देखभाल दुरुस्ती (MC) करणे बंधनकारक आहे. त्यानुसार संबंधित मक्तेदार यांनी सदर कालावधीत उभारणी केलेल्या १५६० पथदिव्यांना भेटी दिल्याचे तपासणी अहवाल उपलब्ध आहेत. तसेच उभारणी केलेल्या १५६० पथदिव्या बाबतचा तिमाही अहवाल जिल्हा परिषद, कोल्हापूरकडे दप्तरी उपलब्ध आहेत.

(२) ग्रामपंचायतीकडून जमा झालेल्या निधी ज्या त्या आर्थिक वर्षामध्ये खर्च होणार नसल्याने तसेच निधीचा एकत्रित ताळमेळासाठी ग्रामपंचायत हिस्सा जिल्हा परिषदेने ११ ब ठेव संकीर्ण सदरी ठेवणेत आलेला होता. ज्यादा जमा रक्कम रुपये ७,३५,१५०/- ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार त्यांना अदा केलेले आहेत.

(३) सदरची योजना ही रु. ३,०८,१०,०००/- इतक्या रक्कमेची होती. आयकर अधिनियम १९३१ चे कलम १९४ (C) प्रमाणे २% आयकर रक्कम रुपये ३,०८,१०,०००/- या रक्कमेवर आयकर कपात करणे आवश्यक होते. मक्तेदाराची कामनिहाय देयके अदा करतेवेळी रक्कम रुपये ५,२१,८९७/- इतका वसुल केलेला असून उर्वरित आयकर कंत्राटदार यांनी स्वतःभरणा केलेला आहे.

(४) मक्तेदारास सौर पथदिवे बसविलेनंतर ९० टक्के रक्कम व उर्वरित १० टक्के रक्कम ही प्रगती अहवाल व राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी घेतल्यानंतरच अदा करणेत आलेली आहे.

(५) मेडा दर करार अट क्र.१२ (ड) प्रमाणे पथदिप स्पेसिफीकेशन प्रमाणे १२ गटातील एकूण ५२० ग्रामपंचायतींची रँडम तपासणी केली असून रँडम तपासणीचे अहवाल दप्तरी उपलब्ध आहेत.

वरीलप्रमाणे खुलासा अवलोकनी येऊन मान्य करणेस विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, अनेक गावांमध्ये भारनियमन नसताना रात्री सौर पथदिवे तेथे लावण्यात आले आहेत. ज्या गावामध्ये सौर पथदिवे लावण्यात आले आहेत त्या गावामध्ये रात्रीचे भार नियमन होत असल्याची विद्युत विभागाकडून खात्री करण्यात आली होती काय, समितीचे असे म्हणणे आहे की जर त्या गावामध्ये भार नियमन असेल तर रात्रीचे पथदिवे लावून भार नियमन थांबविता येईल काय, ज्या गावामध्ये भार नियमन असेल त्या गावात सौर पथदिवे लावत असाल. पण याबाबत महावितरणकडून खात्री केली आहे काय, कारण आताही असे सौर पथदिवे लावत आहात. मात्र आता राज्यात जादा वीज आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सौर पथदिवे बसविण्याबाबत त्या गावामध्ये भारनियमन होत असल्याची वीज मंडळाकडून खात्री केली नव्हती. सौर पथदिवे मेडाकडून प्राप्त होतात. यावर समितीने पुढे विचारणा केली की, शेवटी निधी कोणता वापरतो तर जिल्हा परिषदेचा, कार्यान्वयीन यंत्रणा कोण आहे तर जिल्हा परिषद. आक्षेप जिल्हा परिषदेवर आला आहे म्हणजे जिल्हा परिषदेने हा निधी खर्च केला आहे. त्यामुळे या सर्व बाबी तपासल्या पाहिजेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हे काम महावितरणकडेच असते. सौर पथदिवे बसविण्याबाबतचे हे काम संबंधित ग्रामपंचायतीकडून मागणी केल्यानंतर त्याला निधी दिला जातो. त्यामुळे वीज मंडळाकडून भार नियमनासंबंधी माहिती घेत नाही.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सौर पथदिवे बसविण्याबाबत कोणाची तांत्रिक मंजुरी घेण्यात आली होती. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, पर्यावरण संतुलीत गावांसाठी सदरहू योजना होती. ही योजना दिनांक ३० मार्च, २०१३ ला सुरू करण्यात आली होती. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विदित केले की, अशा प्रकारची कामे ग्रामपंचायतीसाठी घेता येतात, अशा प्रकारचा शासन निर्णय आहे. १२० ग्रामपंचायतीचा या योजनेमध्ये समावेश करण्याबाबत ग्रामविकास विभागामार्फत सांगितलेले होते. बैठकीअंती समितीने असे मत व्यक्त केले की, गावांमध्ये भारनियमन होते किंवा नाही, याची खात्री न करता त्या ठिकाणी कशा प्रकारे निधी खर्च करण्यात आला, कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना सौर पथदिवे पुरविणे योजनेतील अनियमितता या संदर्भात समितीने अनेक प्रश्न उपस्थित केले. परंतु सौर पथदिवे बसविण्याच्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी समितीला समाधानकारक उत्तरे दिलेली नाहीत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना सौर पथदिवे पुरविणे योजनेतील अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम २६१०/ प्र.क्र.१/पंरा-४ दिनांक १८ ऑगस्ट, २०१० नुसार पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेंतर्गत सर्व निकषांची पुर्तता केलेल्या व प्रोत्साहनपर बक्षीस रक्कमेस पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींना सौरपथ दिवे आस्थापित करणेस शासनाने मंजूरी दिलेली आहे.

शासन निर्णय क्रमांक सौऊदि-२०१३/प्र.क्र.१५/परा-६ दिनांक ३० मार्च, २०१३ नुसार सन २०११-२०१२ मध्ये १००० पेक्षा कमी लोकसंख्या असणा-या पात्र २१२ ग्रामपंचायती तसेच सन २०१२-२०१३ करीता १००० ते २००० लोकसंख्या असणा-या पात्र ३०८ ग्रामपंचायती अशा एकूण ५२० ग्रामपंचायतींना प्रत्येकी ३ नग सौरपथ दिवे या प्रमाणे एकूण १५६० सौरपथ दिवे मंजूर करणेत आलेले आहेत.

सदर सौरपथ दिवे बसविणेसाठी शासनाकडून दिनांक ३० मार्च, २०१३ च्या शासन निर्णयान्वये ग्लोमिंग पावर सोलर सिस्टीम कोरेगाव जि.सातारा यांना एजन्सी नेमून सौर पथदिवे बसविण्याकरीता शासनाकडून मान्यता दिलेली आहे. सदर एजन्सीकडून सौर पथदिवे आस्थापित करणेत आलेली आहेत. सौर पथदिवे आस्थापीत झाल्यानंतर ५ वर्षे देखभाल दुरुस्ती एजन्सीकडून करारपत्राप्रमाणे करून घेणेत आलेली आहे. सदरची ५ वर्षे मुदत पूर्ण झाल्यानंतर एजन्सीला बँक गॅरंटी रक्कम परत केलेली आहे. तसेच मेडा यांचेकडील दिनांक १७ जुलै, २०१२ च्या दरकरारानुसार खर्च करणेत आलेला आहे.

वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार मंजूर करणेत आलेल्या ग्रामपंचायतींनाच सौर पथदिवे आस्थापित करणेत आलेले आहेत. त्यामुळे सौर पथदिवे पुरविणे योजनेमध्ये अनियमितता झाली असलेचे दिसून येत नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (योजना-१) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना सौर पथदिवे पुरविणे योजनेतील अनियमिततेप्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास उक्त चौकशीमध्ये काय निदर्शनास आले ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विदित केले की, सदरहू प्रकरणाची चौकशी पूर्ण झालेली आहे. दिनांक ३० मार्च, २०१३ च्या शासन निर्णयानुसार शासनाने ग्रामपंचायतींची निवड केली होती. परंतु सदरहू ग्रामपंचायतींची निवड कोणत्या निकषाच्या आधारे करण्यात आली, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. दिनांक १८ ऑगस्ट, २०१० च्या पर्यावरण संतुलित ग्राम समृध्द योजनेंतर्गत निकष पूर्ण केलेल्या ९२० गावांची यादी शासनाकडे सादर केली होती. तद्नंतर शासनाने दिनांक ३० मार्च, २०१३ च्या निर्णयानुसार १००० पेक्षा कमी लोकसंख्या असणा-या पात्र २१२ ग्रामपंचायती तसेच सन २०१२-२०१३ करिता १००० ते २००० लोकसंख्या असणा-या पात्र ३०८ ग्रामपंचायती, अशा एकूण ५२० ग्रामपंचायतींची सौर पथदिवे पुरविण्यासाठी निवड केली होती व त्यांना सौर पथदिवे पुरविण्यात आले आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीच्या रकान्यात "सौर पथदिवे आस्थापित झाल्यानंतर पाच वर्षे देखभाल व दुरुस्ती एजन्सीकडून करारपत्राप्रमाणे करून घेण्यात आलेली आहे. सदरची पाच वर्षे मुदत पूर्ण झाल्यानंतर एजन्सीला बँक हमी रक्कम परत केलेली आहे." असे नमूद करण्यात आलेले आहे. उक्त ५२० ग्रामपंचायतींकडून सौर पथदिवे पाच वर्षे व्यवस्थित सुरु होते अशा प्रकारचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, एखादा सौर पथदिवा खराब झाल्यास ग्रामपंचायतींनी एजन्सीला तसे कळवावयास पाहिजे. परंतु कोणत्याही ग्रामपंचायतीकडून सौर पथदिवे खराब झाल्याबाबतची कोणतीही तक्रार आलेली नाही.

## अभिप्राय व शिफारशी

कोल्हापूर जिल्हा परिषदेने कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना सौर पथदिवे पुरविणे या योजनेंतर्गत सन २०११-२०१२ करिता २१२ ग्रामपंचायतीसाठी प्रती ग्रामपंचायत ३ सौर पथदिवे याप्रमाणे ६३६ सौर पथदिवे तसेच सन २०१२-२०१३ करिता ३०८ ग्रामपंचायतीकरीता ९२४ सौर पथदिवे असे एकूण १६६० सौर पथदिवे बसविणेचे उद्दिष्ट होते. याकरिता राज्य शासन हिस्सा रक्कम रुपये १,४९,७६,०००/- व ग्रामपंचायत हिस्सा रक्कम रुपये ६५,९१,०००/- एकूण रुपये २,१५,६७,०००/- एवढी रक्कम मक्तेदारास अदा केलेली आहे. यासंदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३० मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ आणि मेडा यांचे दिनांक १७ जुलै, २०१२ रोजीचा दर करार अट क्र.७ नुसार सौर पथदिव्यांची ५ वर्षे देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक आहे. सदर कालावधीत उभारणी केलेल्या १६१० पथदिव्याबाबत दर तिमाही मक्तेदारांनी भेट देऊन दुरुस्ती रजिस्टरला नोंद घेणे आवश्यक होते. याप्रकरणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, **कोणत्याही ग्रामपंचायतीकडून तक्रार न येणे ही बाब व सौर पथदिवे व्यवस्थितरित्या सुरु असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे या दोन वेगवेगळया बाबी आहेत, त्यामुळे केवळ कोणत्याही ग्रामपंचायतीकडून सौर पथदिव्यांच्या संबंधात तक्रार आली नाही याचा अर्थ सर्व सौर पथदिवे व्यवस्थितरित्या सुरु होते असा लावणे योग्य नाही. याउलट सर्व सौर पथदिवे संपूर्ण पाच वर्षांच्या कालावधीत व्यवस्थितरित्या सुरु होते असे सर्व संबंधित ग्रामपंचायतींकडून प्रमाणपत्र घेणे जास्त संयुक्तिक ठरले असते असे समितीचे मत आहे. अशा प्रकारची कोणतीही प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेतलेली नसतानाही संबंधित मक्तेदारास संपूर्ण देयकाची रक्कम अदा करण्यात येणे ही बाब निश्चितच समाधानकारक नसल्याचे समितीचे मत आहे.**

**याप्रकरणी नियमानुसार कार्यवाही होणे अपेक्षित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

## प्राथमिक शाळांसाठी ड्युअल डेस्क खरेदीबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८६/३ (सन २०१३-१४)**

सन २०१३-१४ मध्ये नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेने प्राथमिक शाळांना ड्युअल डेस्क (इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था) पुरवठा करणेकरीता प्रमाणक क्रमांक २५०, दिनांक ३० जुलै २०१३ अन्वये मे. तिरुपती ट्रेडींग, परळी वैजनाथ, जि. बीड यांना रक्कम रुपये ९९,९६,००० अदा केले आहे व याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण /२०१३/(१७/१३)/ अर्थसंकल्प, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१३ अन्वये राज्यातील शाळांना एकसारख्या स्पेसिफिकेशनच्या भौतिक सुविधा मिळाव्यात यासाठी इको पॉलीमर ड्युअल डेस्क खरेदी करावेत असे सूचित केल्याने शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी ई-टेंडर मागवून खरेदी केली आहे. खरेदी धोरण हा भाग उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अखत्यारीतील असल्याने इको पॉलीमर ड्युअल डेस्क खरेदी करणे बाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची सहमती घेण्यात आली नाही.

(२) खरेदी केलेले पॉलीमर डेस्क हे इको फ्रेंडली आहेत किंवा कसे याबाबत शासनाच्या पर्यावरण विभागाने अथवा भारतीय मानक ब्युरोने चिन्हांकित केलेले नाही.

(३) शिक्षण संचालक, (प्राथमिक), पुणे यांचे अध्यक्षतेखाली गठित केलेल्या खरेदी समितीने मंजूर केलेली डेस्क मॉडेलचे स्पेसिफिकेशन व पुरवठादाराने पुरवठा केलेली मॉडेल याचे स्पेसिफिकेशन एकच असल्याबाबत शिक्षण विभागाने खात्री केलेली नाही.

(४) खरेदी केलेले बेंच चिन्हांकित नसल्याने महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक, दिनांक २ जानेवारी, १९९२ चे परिशिष्ट -८ प्रमाणे प्लास्टिक व अभियांत्रिकी वस्तुच्या दर्जा तपासणी अहवाल व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्युट माटुंगा, मुंबई या संस्थेकडून घेणे आवश्यक असताना तशी तपासणी केली नाही.

(५) बेंच खरेदी पुरवठा आदेश, दिनांक ३० मार्च २०१३ रोजी दिले असून खरेदी करार अटीप्रमाणे पुरवठा ४५ दिवसात करणे बंधनकारक आहे. अन्यथा अट क्रमांक ३ व पर्चेस मॅन्युअल मधील तरतुदीप्रमाणे पुरवठा कालावधीत पुरवठा न केल्यास व खरेदी किंमत १० लाखापेक्षा अधिक असल्यास १ टक्का दंड प्रति आठवडा आकारणी करणेची तरतूद आहे. बेंचचा पुरवठा अंशतः विलंबाने झाल्याने रक्कम रुपये ७,९९,८२५ विलंब दंड वसूल करून जिल्हा परिषद निधीत जमा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शकात नमूद केलेनुसार प्राथमिक शाळासाठी ड्युअल डेस्क (इको फ्रेंडली पॉलीमर बैठक व्यवस्था) खरेदी बाबत शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र. प्राशिसं/EPSA-Desk/२०१२-२०१३/८१०४, दिनांक २७ डिसेंबर २०१२ प्रमाणे सदरच्या पत्रात नमूद केलेनुसार या विभागाकडून त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. खरेदी प्रक्रिया शिक्षण संचालक कार्यालयाकडील कार्यप्रणालीप्रमाणे झालेली आहे.

(२) शकात नमूद केलेनुसार शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील पत्र क्र.प्राशिसं/EPSA-Desk/२०१२-२०१३/८१०४, दिनांक २७ डिसेंबर २०१२ प्रमाणे खरेदीची कार्यवाही केलेली आहे. याबाबत साहित्याचे स्पेसिफिकेशन एकच असल्याबाबत सुपरिटेडंट कंपनी ऑफ इंडीया (पी) लिमिटेड, मुंबई यांचे दिनांक १० एप्रिल, २०१३ चे इन्स्पेक्शन /टेस्ट रिपोर्ट प्रमाणित केले आहे.

(३) याबाबत साहित्याचे स्पेसिफिकेशन एकच असल्याबाबत सुपरिटेंडंट कंपनी ऑफ इंडिया (पी) लिमिटेड, मुंबई यांचे दिनांक १० एप्रिल, २०१३ चे इन्स्पेक्शन/टेस्ट रिपोर्ट प्राप्त आहे. तसेच प्रत्यक्ष पुरवठा केलेनंतर याबाबतची खात्री करून याची नोंद गटशिक्षण कार्यालयातील डेडस्टॉक बुकामध्ये घेणेत आली आहे.

(४) सदर खरेदीची कार्यवाही ही शिक्षण संचालक, पुणे यांचेकडून झालेली आहे. त्यांचे पत्र क्र. प्राशिसं/EPSA-Desk/२०१२-२०१३/८१०४, दिनांक २७ डिसेंबर, २०१२ अन्वये या कार्यालयाने दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी पुरवठादार या गटांना बेंच पुरविणेबाबतचा पुरवठा आदेश दिलेला आहे व पुरवठा आदेशाप्रमाणे रक्कम अदा कलेली आहे.

(५) ड्युअल डेस्क (इको फ्रेंडली पॉलमर बैठक व्यवस्था) पुरवठा करणेबाबतचे आदेश दिल्यानंतर ४५ दिवसाचे आत २,४९६ नग बेंच पुरवठा करणे आवश्यक होते. तथापि, फार मोठ्या प्रमाणात बेंचचा पुरवठा करावयाचा असल्याने अंशतः विलंब झालेला आहे. तसेच संबंधित पुरवठादारास दंड भरणेसंबंधी नोटीस दिलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, यामधील दंडाची रक्कम रुपये ७ लाख ९९ हजार ८२५ वसूल करण्यात आलेली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३ सप्टेंबर २०१८ रोजी दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू काम कोणत्या योजनेमधून करण्यात आले होते ? यासाठीच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता कोणामार्फत मिळाली होती. जिल्हा परिषदेच्या डी.पी.डी.सी.मधून यासाठी मंजुरी मिळाली होती काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी सर्वसाधारण सभेचा ठराव दिला होता व जिल्हाधिकारी यांनी दिनांक २९ मार्च, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती.

यावर समितीने विचारणा केली की, पुरवठा आदेश कधी देण्यात आलेले होते, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, दिनांक २० मार्च, २०१३ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. यासाठीचा करारनामा शिक्षण उप संचालक यांच्याकडून झालेला होता. करारनाम्यावर शिक्षण अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी आहे.

यावर समितीने विचारणा केली की, करारनामा स्वीकृतीचे अधिकार कोणाला आहेत, जर खरेदी प्रक्रियेमध्ये अडचणी असतील तर त्या अडचणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी तपासल्या पाहिजेत. करारनाम्याशिवाय पुरवठा आदेश देता येत नाही. करारनाम्यास ज्या सक्षम अधिका-यांनी मंजुरी दिली त्यांनी तो स्वीकारला पाहिजे. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता कशा प्रकारे दिली. सदरहू योजनेचा खर्च हा ५० लाख रुपयांच्या पुढील आहे. ५० लाख रुपयांच्या करारनाम्याच्या स्विकृतीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला आहेत. या योजनेचा निधी जिल्हा परिषद देणार आहे, त्याचप्रमाणे कोणत्या शाळेमध्ये इको फ्रेंडली बेंच बसवावयाचे आहेत, हे जिल्हा परिषद ठरविणार आहे. असे असताना जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासकीय मान्यता कशा प्रकारे देऊ शकते. यासाठी टेंडर देण्यात आलेले होते काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने निर्गमित केलेले दिनांक ५ फेब्रुवारी, २०१३ रोजीचे परिपत्रक होते. त्यामध्ये म्हटले होते की, इको फ्रेंडली पॉलिमर बैठकीचा डेस्क तयार करून घेण्यात यावा आणि त्यानुसार ९० दिवसांच्या आत शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करण्यात यावा. तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, शासनाने ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार राज्य सरकारच्या १३९ योजना जिल्हा परिषदेला वर्ग केलेल्या आहेत. पूर्वी योजना मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नव्हते. सन २००० नंतर अशा प्रकारचे अधिकार सर्व विभाग प्रमुखांना मिळालेले होते. आता खाते प्रमुखांपासून सर्वांना अशा प्रकारचे अधिकार मिळालेले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी पुरवठा आदेश दिलेला आहे. मालाचा पुरवठा केव्हा झाला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ६ जून, २०१३ रोजी ड्युअल डेस्कचा पुरवठा झाला. दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजी चाचणी अहवाल प्राप्त झाला. यावर समितीने विचारणा केली की, शाळांसाठी ड्युअल डेस्क खरेदी करण्यासाठी मंजुरी द्यावी असा प्रस्ताव जिल्हा परिषदेसमोर ठेवला होता काय, ड्युअल डेस्कचा नमुना जिल्हा परिषद सभागृहाला दाखविला आहे काय, जिल्हा परिषदेला जो नमुना दाखविण्यात आला त्याच मालाचा पुरवठा झाल्याची खात्री केली काय, पुरवठा आदेश देताना अटी व शर्ती घालण्यात आल्या असतील त्याप्रमाणे करारपत्रावर स्पेसिफीकेशन ठरविण्यात आले असेल. दर करार कोणासोबत झाला. तो दर करार पूर्ण राज्यासाठी झाला होता अथवा कोल्हापूर जिल्ह्याकरिता झालेला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांनी पुरवठा आदेश देताना ज्या अटी व शर्ती टाकल्या त्यानुसार पुरवठा करावा लागला असेल. पुरवठादाराला महिन्याभरात पुरवठा करण्याची मुदत देत आहोत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांनी विदित केले की, संचालक, शिक्षण विभाग यांचेसोबत दर करार झाला. संचालकांनी ४५ दिवसांमध्ये पुरवठा करण्यास सांगितले असेल तर आपण त्यांना ३० दिवस देऊ शकत नाही. जिल्हापरिषदेचा ठराव काय होता हे पहावे लागेल. दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. ही ट्रान्सफर स्कीमची योजना आहे. तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, संचालक पैसे देत नाहीत. या खरेदी प्रक्रियेमध्ये जिल्हा परिषदेला डावललेले आहे. योजनेला मंजुरी घेतली परंतु खरेदीला मंजुरी घेतली नाही. जिल्हा परिषदेने योजनेला मंजुरी घेऊन तो प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे पाठविला आहे. प्रथम अर्थसंकल्प मंजूर होतो. अर्थसंकल्पामध्ये ज्या बाबी मंजूर केलेल्या असतात त्याचे वेगवेगळे प्रस्ताव दिले जातात त्यावर मंजुरी दिली जाते. दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीचा डीपीसी बाबतचा शासन निर्णय वाचावा असे सांगितले. यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांनी विदित केले की, ही जिल्हा परिषद स्वनिधीची योजना आहे.

यावर समितीने विचारणा केली की, स्व:निधी असो किंवा जिल्हा परिषदेचा कोणताही निधी असो. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा झाल्यावर तो जिल्हा परिषदेला बाईडींग होतो. संचालकांनी जिल्हा परिषदेला विश्वासात घेऊन ही प्रक्रिया करावी लागेल. दर करार

कंपनीबरोबर झाला असेल तरी पुरवठा आदेश आपल्या सहीने दिलेला आहे. संचालकांनी पुरवठा आदेश दिलेला नाही देयक मंजूर करून अदा केले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या खरेदीस जिल्हापरिषदेची मान्यता आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि शिक्षण अधिकारी यांची सही होती.

यावर समितीने विचारणा केली की, आकस्मिकता निधीमधून खरेदी केलेली नाही. आकस्मिकता निधीमधून खर्च करण्याचे आपणास अधिकार आहेत. जिल्हा परिषद ती बाब सभागृहासमोर ठेवत नाही. इको फ्रेंडली डेस्क जिल्हा परिषदेच्या शाळेत वापरला. त्यावर तिघांची सही होती. पण जिल्हा परिषदेच्या समितीचा ठराव, त्यावर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची सही, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्वसाधारण), यांची सचिव म्हणून सही या सर्व गोष्टी आल्या, परंतु आपण त्या सर्वांना वगळलेले आहे. २३ लाख रुपयांपर्यंतच्या कामांना मंजुरी देण्याचे अधिकार चेअरमनला आहेत. जर २३ लाख रुपयांपर्यंत काम असेल तर ती नस्ती चेअरमनकडे जाते. जर १० लाख रुपयापर्यंतचे काम मंजूर करण्याचे अधिकार खाते प्रमुखांना आहेत. प्राथमिक शाळेसाठी इको फ्रेंडली ड्युअल डेस्क खरेदी करण्यासंदर्भात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. जिल्हा परिषद पदाधिका-यांच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम झालेले आहे. हा डीपीसीचा निधी होता की, ४ टक्के सादील अनुदानाचा होता ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, डीपीसीचा निधी होता असे सांगितले. यावर समितीने विचारणा केली की, संचालक, शिक्षण विभाग यांना काहीच अधिकार नाही. नाविन्यपूर्ण योजना ठरविण्याचा अधिकार डीपीसीचा आहे. या प्रश्नावर बरीच वेळ चर्चा करीत आहोत. डीपीसी फंडाच्या संदर्भात गंभीर बाब समोर आली आहे. हा डीपीसीचा हेड असताना शिक्षण संचालकांच्या माध्यमातून हस्तक्षेप करण्याचे काम झालेले आहे त्याबाबतची सखोल चौकशी झाली पाहिजे. या सर्व बाबी तत्कालिन अधिका-यांनी पहावयास पाहिजे होत्या, ही गंभीर बाब आहे. लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमूद केले आहे की, " तसेच प्रत्यक्ष पुरवठा केलेनंतर याबाबतची खात्री करुन याची नोंद गट शिक्षण कार्यालयातील डेटस्टॉक बुकमध्ये घेण्यात आली आहे. समितीला डेट स्टॉक बुक दाखववावे. कारण त्यामध्ये अद्ययावत नोंदी राहत नाहीत. पुरवठा झालेले साहित्य चाचणीसाठी पाठविल्याची नोंद आहे काय ? ज्याने मालाचा पुरवठा केला त्यांनीच चाचणी अहवाल दिला काय, ज्या साहित्याचा पुरवठा झाला त्याची चाचणी झाली पाहिजे. या संदर्भात आयुक्त कार्यालयाने काय कार्यवाही केली. यावर उप आयुक्त, आयुक्त कार्यालय, पुणे यांनी विदित केले की, विधानमंडळ सचिवालयामध्ये झालेल्या बैठकीत समितीने विभागीय आयुक्तांना सूचना दिल्या. त्या सूचनांप्रमाणे सुधारणा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्राथमिक शाळांसाठी खरेदी करण्यात आलेले ड्युअल डेस्क साहित्याचा पुरवठा ज्या पुरवठादाराने केला आहे त्यानेच चाचणी अहवाल दिलेला आहे काय, सदर साहित्याच्या चाचणी अहवालासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने कोणता निर्णय घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, विधान भवन यांचेकडील पत्र क्रमांक १४७९/म.वि.स./पंरास (ड-६), दिनांक १७ जुलै, २०१९ अन्वये सहसचिव (२) (का), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी सुचित केल्यानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.विकास/आस्था/लेखा/ ५८० / २०१९, पुणे दिनांक २२ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवाल संबंधीत जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करणेसंबंधी कळविणेत आलेले आहे. त्यानुसार संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदर विषय ड्युअल डेस्क खरेदीबाबत आहे. संबंधित जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासंबंधी कळविण्यात आले आहे, शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे, असे म्हटले आहे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी या संदर्भात अवगत करतील असे विदित केले. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणी विभागीय आयुक्तांनी चौकशी करायची होती. २२ तारखेला त्यांनी ऑर्डर काढली आहे. ११ अधिकारी, कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत सांगितले आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

यावर समितीने विचारणा केली की, विभागीय चौकशी किती दिवसांत पूर्ण होईल, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, २२ तारखेला पत्र मिळाले आहे. उद्या किंवा परवा कारणे दाखवा नोटीस काढतो. कारणे दाखवा नोटीसमध्ये ७ दिवसांचा कालावधी देतो. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, हा विषय मी बैठकीत घेतला होता. समितीने सांगितल्यामुळे प्रकरणांत जास्त कारवाई होत आहे. सदर प्रकरणी सर्वात मोठी चूक अशी झाली होती की, दर्जा निरीक्षणाचा अहवाल आला होता, तो ठेकेदाराच्या नावावर आला होता, तो विभागाच्या नावावर आला नव्हता. त्यामुळे समितीने असे सांगितले आहे की, दर्जाबाबत सखोल चौकशी विभागीय आयुक्तांनी करावी आणि निर्णय घ्यावा. आतापर्यंत दर्जाबाबत दर्जा चुकीचा आहे, असा कोणताही आरोप नाही. दर्जा चांगला नव्हता, असे पेपरवर काही दिसत नाही. फक्त दर्जाचा अहवाल ठेकेदाराच्या नावावर आला म्हणून त्यांनी आणला असावा, त्यांनी पाठपुरावा केला असावा, असे वाटत आहे. त्यामुळे ११ कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस देऊन विभागीय चौकशी सुरू करीत आहोत. ही पध्दत चुकीची होती. हे थांबले पाहिजे.

यावर समितीने विभागीय चौकशी सुरू करणे म्हणजे त्यांच्या सर्व आर्थिक गोष्टी थांबतील असे म्हटले. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी होकारार्थी उत्तर दिले. यावर समितीने चूक झाली आहे ठीक आहे. विभागाने ही कारवाई करीत असताना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार त्यांना संधी दिली होती की, सरळ कारवाई केली अशी विचारणा केली असता त्यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, त्यांनी त्यांच्या नावावर अहवाल द्यायला नको होता. अहवाल विभागाच्या नावावर दिला पाहिजे होता. विभागाचा शासन निर्णय सायलेंट आहे.

प्रोसिजरल लॅप्सेस गृहीत धरु या. गंभीर स्वरुपाची शिक्षा द्यायची असेल तर विभागीय चौकशी सुरू केली जाते. मी पाहिलेल्या कागदपत्रावरुन असे वाटते की, ११ कर्मचा-यांना अशाप्रकारे वेठीस धरण्याचे काही कारण नाही. आपली परवानगी असेल तर मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांचा खुलासा घेऊन विभागीय चौकशी करायची की नाही याबाबतचा निर्णय घ्यावा. सौम्य स्वरुपाची शिक्षा देऊन हा विषय संपवावा.

यावर समितीने मत व्यक्त केले की, ते एकूण ११ कर्मचारी आहेत. सर्व जणांवर कारवाई करीत राहिलो तर कर्मचारी कमी होतील. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की, मूळ शासन निर्णयाचा अभ्यास केला आहे. उद्योग विभागाचा सन १९९२ च्या जवळपासचा शासन निर्णय आहे. कार्यपध्दतीमध्ये याबाबत सायलेंट आहे. त्यांनी म्हटलेलेच नाही की, नमुना पुरवठादाराने तपासणीसाठी पाठवावा की विभागाने पाठवावा. त्यामुळे तो शासन निर्णय ओपन इंटरप्रिटेशन राहिला आहे. अशी शक्यता आहे की, हे एक प्रकरण नाहीतर वेळोवेळी असे घडले असेल. पुरवठादाराला सांगण्यात आले असेल की, तुम्ही तपासणी करून घ्यावी. कारण यामध्ये तरतूद स्पष्ट नाही. शासन निर्णयामध्ये स्पष्टता आणली पाहिजे, या मताची मी आहे.

यावर समितीने सहमती दर्शवून हे बरोबर आहे, विभागाने त्यामध्ये स्पष्टता आणावी. मात्र या सर्व बाबी तपासून पहाव्यात असे निदेश दिले. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा यांनी माहिती दिली की, सदरहू शासन निर्णय रद्द झाला आहे. तो शासन निर्णय सन २०१३-१४ मध्ये लागू होता. आता नवीन शासन निर्णय आला आहे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की, नवीन शासन निर्णयामध्येच या बाबीच्या संदर्भात स्पष्टता आणली पाहिजे. नवीन शासन निर्णयात ही बाब सायलेंट आहे. तद्नंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी संबंधितांकडून खुलासा घ्यावा आणि त्या आधारे निर्णय घ्यावा की, विभागीय चौकशीची गरज आहे की सौम्य शिक्षा देता येईल.

यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी योग्य निर्णय घ्यावा. कोणावरही अन्याय होऊ नये याबाबत देखील तपासून घ्यावे आणि नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार संबंधिताला संधी द्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल असे समितीस सांगितले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ मध्ये नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना ड्युअल डेस्क (इको फ्रेंडली पॉलिमर बैठक व्यवस्था) पुरवठा करणेकरीता दिनांक ३० जुलै २०१३ रोजी मे.तिरुपती ट्रेडींग, परळी वैजनाथ, जि. बीड यांना रुपये ९९,९६,००० एवढी रक्कम अदा करण्यात आली.

इको फ्रेंडली पॉलिमर ड्युअल डेस्क खरेदी करणेबाबत शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ५ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार खरेदी धोरण हा भाग उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अखत्यारितील भाग असल्याने सदर विभागाची सहमती घेण्यात आली नाही. खरेदी केलेले पॉलिमर डेस्क पर्यावरण पुरक (इको फ्रेंडली) आहेत किंवा कसे याबाबत पर्यावरण विभागाने अथवा भारतीय मानक ब्युरोने चिन्हांकित केलेले नाही. खरेदी समितीने मंजूर केलेले डेस्क मॉडेलचे स्पेसिफिकेशन व पुरवठादाराने पुरवठा केलेली मॉडेल यांचे प्रमाणक (स्पेसिफिकेशन) एकच असल्याबाबत शिक्षण विभागाने खात्री केलेली नाही. बेंचचा पुरवठा अंशतः विलंबाने झाल्याने रक्कम रुपये ७,९९,८२५ विलंब दंड वसूल करून जिल्हा परिषद निधीत जमा करणे आवश्यक होते.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने केलेल्या लेखी खुलाशाच्या अनुषंगाने समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, बेंच पुरवठा करण्यास अंशतः विलंब झाल्याप्रकरणी दंडाची रक्कम रुपये ७,९९,८२५/- वसूल करण्यात आलेली आहे. दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी डयुअल डेस्क खरेदीबाबतचा सर्वसाधारण सभेचा ठराव घेण्यात आला होता व जिल्हाधिकारी यांनी दिनांक २९ मार्च, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती व दिनांक २० मार्च, २०१३ रोजी ड्युअल डेस्क पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. सदरहू योजनेचा खर्च ५० लाख रुपयांच्या पुढील असल्याने करारनामा स्वीकृतीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेला असताना या खरेदीप्रक्रियेमध्ये जिल्हा परिषदेला डावलून खरेदीला मंजूरी घेताना जिल्हाधिका-याकडे प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. **वास्तविक पहाता जिल्हा परिषदेचा स्वनिधी असो किंवा कोणताही निधी असो तो मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा झाल्यावरच सदर निधी कोणत्या शिर्षावर खर्च करावयाचा हे ठरविण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस असतात. त्यामुळे याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांच्या अधिकारावर गदा आणण्याची कृती यामुळे झालेली आहे. परिणामस्वरुप प्राथमिक शाळेसाठी पर्यावरणपुरक ड्युअल डेस्क खरेदी करण्यासंदर्भात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तसेच जिल्हा नियोजन विकास समितीच्या निधी संदर्भात देखील संचालक, शिक्षण विभाग यांच्या माध्यमातून हस्तक्षेप करण्यात आल्याचे दिसून येत आहे त्यामुळे ही गंभीर बाब आहे. यास्तव समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. यासंदर्भात सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा. तसेच ड्युअल डेस्क साहित्याचा पुरवठा करणा-या पुरवठादारानेच साहित्याचा चाचणी अहवाल दिल्याप्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून दिनांक २२ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करणेसंबंधी कळविणेत आलेले आहे. याबाबतचा चौकशी व त्यावर कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

### सन २०१३-२०१४ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अनामत व तसलमात (अग्रिम) रकमांबाबत)

**परिच्छेद क्रमांक ३.११९३ (९१)/३ (सन २०१३-१४)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ९१ | अनामत व तसलमात रकमांबाबत | कोल्हापूर | आरोग्य विभाग, जि.प. कोल्हापूर | ३ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २००९-२०१० मधील कर्मचारी सण तसलमात रक्कम रुपये १,२५,०००/- वसुल करुन भरणा केलेली आहे व तशी नोंद तसलमात नोंदवहीत घेणेत आलेली आहे. रेकॉर्ड अलाहीदा लेखापरिक्षणास सादर करणेत येत आहे.

(२) सन १९६५-१९६६ ते १९८२ अखेर *८ क * इतर तसलमात रक्कम रुपये ७५,६८७ समायोजनाचा प्रस्ताव अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे कार्यालयाकडे दिनांक २२ मे, २०१० अन्वये सादर करणेत आलेला होता. तथापि, त्यांनी प्रस्ताव नामंजुर केलेला आहे. त्यामुळे आता सन १९६५ ते २००३ अखेरच्या प्रलंबित रकमा रुपये १,०१,३९२.१० हे संबंधित कर्मचारी यांचेकडून वसुली करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे. सदरच्या रक्कमा ह्या कुटूंब कल्याण ट्युबॅक्टामी कॅम्पसाठी व इतर ऑपरेशन कॅम्पसाठी पब्लिक हेल्थ ऑफीसर, जिल्हा परिषद यांचे नावाने घेतलेल्या आहेत.

(३) परिच्छेदामध्ये नमुद कर्मचारी श्रीमती भिडे यांचे ६० हप्त्यांपैकी ५० हप्ते वसुल झालेले असुन उर्वरीत हप्ते वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

डॉ. श्रीमती माळवे, यांचे ६० हप्त्यांपैकी १० हप्ते वसुल झालेले असुन उर्वरीत वसुलीची कार्यवाही सुरू आहे. डॉ. एम.एच. चव्हाण यांची १०० टक्के वसुली झालेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, थकीत तसलमात रक्कम रुपये १,०१,३९२/- वसूल करणेचे नियोजन काय आहे, अग्रीम रक्कम देण्याची तरतूद आहे काय, जिल्हा परिषदेच्या खात्यामधून एखाद्या खातेप्रमुखाला अग्रीम रक्कम देता येते काय, त्यासाठी जिल्हा परिषदेची मंजुरी घेण्याची आवश्यकता नसते काय, मुख्य लेखा अधिका-यांना अशा प्रकारच्या परस्पर रक्कम देण्याचे अधिकार शासनाने दिलेले आहेत काय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना किती रुपयांपर्यंतचे अधिकार आहेत, एखाद्या योजनेचा निधी दुसरीकडे वळविण्यासाठी मर्यादा घालून दिलेल्या आहेत.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारात सदरहू बाब येत असते. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीनंतर मुख्य लेखा अधिकारी यांना अग्रीम रक्कम देण्याचे अधिकार आहेत. एखाद्या प्रकरणामध्ये जो काही खर्च होईल त्याच्या ८० टक्क्यापर्यंत अग्रीम रक्कम देता येते.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेच्या निधीमधील रक्कम अर्थसंकल्पाप्रमाणे खर्च केली जात असते. एखाद्या योजनेचे किंवा अग्रीम रक्कम देण्याचे अधिकार शासनाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना दिलेले आहेत ते अधिकार चुकीचे आहेत. जो पर्यंत विषय समितीची मंजुरी मिळत नाही तो पर्यंत आहरण व संवितरण अधिकारी (डी.डी.ओ.) यांना अग्रीम रक्कम देता येत नाही. या प्रकरणामधील पैसे जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांना देण्यात आलेले आहेत. ते पैसे देण्यापूर्वी जिल्हा परिषदेची मंजुरी घेण्यात आलेली होती काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मंजूर असलेल्या योजनेमधून अशा प्रकारचे अग्रीम देता येतात. त्यासाठी स्वतंत्र धोरण नाही. जिल्हा परिषदेच्या सभेची यासाठी मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेला निधी मिळाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावाने पैसे मिळत असतात. त्यानंतर ते देयक करून मुख्य लेखा अधिका-यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येत असते. परंतु जो पर्यंत वित्त मंजुरी मिळत नाही तो पर्यंत त्यांनादेखील पैसे खर्च करता येत नाहीत. जो पर्यंत विषय समिती मंजुरी देत नाही तो पर्यंत आहरण व संवितरण अधिकारी (डी.डी.ओ.) यांना अधिकार राहत नाहीत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जो लेखाशीर्ष असतो त्या लेखाशीर्षावर खर्च करण्याची परवानगी दिली जाते. साठ दिवसांच्या कालावधीमध्ये अग्रीम देयकाचा कालावधी सादर करावा लागेल, त्यानंतर अग्रीमचे पैसे समाविष्ट करता येतात. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अग्रीम रक्कम देण्यात आलेल्या आहेत, परंतु त्या जमा झालेल्या नाहीत. असे ब-याच ठिकाणी निदर्शनास आलेले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अनेक प्रकरणामध्ये अग्रीम रकमेची तरतूद आवश्यक ठरते.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१३-२०१४ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबीमध्ये अनामत व अग्रीम रक्कम म्हणून किती रुपये गुंतलेले आहेत. सदर रक्कम वसुल करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे व याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन १९६५ ते २००३ या कालावधीतील आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील अनामत अग्रीम रक्कम रुपये १,०१,३९२/- प्रलंबित आहेत.

कुटुंब कल्याण कॅम्पसाठी पब्लिक हेल्थ ऑफिसर, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे नावे सदरची रक्कम अग्रीम स्वरुपात देण्यात आलेल्या होत्या.

सद्यःस्थितीत रुपये १,०१,३९२/- पैकी रुपये २४,०५०/- रक्कम वसुल करण्यात आली असून (सोबत चलनाची झेरॉक्स प्रत जोडण्यात आली आहे) उर्वरित रुपये ७७,३४२/- इतक्या रक्कमेची वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

तथापि, सन १९६५ ते १९८२ अखेर काही अधिकारी मयत झाले आहेत. त्याचे पत्ते उपलब्ध होत नाहीत. तसेच महापूर (सन २००५-२००६) आल्याने रेकॉर्ड खराब झाल्यामुळे ते प्रयत्न करूनही उपलब्ध होत नाही, म्हणून सन १९८२-१९८३ च्या पूर्वीच्या अग्रीम रकमा क्षमापित करणेसाठी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना कळविण्यात आलेले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २०१३-१४ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबींमध्ये गुंतलेल्या रकमेची वसुली पूर्ण झाली आहे काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी एकूण वसुली १ लाख १ हजार रुपये करावयाची होती. त्यापैकी २४ हजार रुपये वसुली झालेली आहे. उर्वरित ७७ हजार रुपयांची वसुली सन १९६५ ते १९८२ या कालावधीतील आहे. उक्त कालावधीतील काही अधिकारी मयत झालेले आहेत. काहींचे पत्ते उपलब्ध होत नाहीत. तसेच सन २००५-०६ मध्ये महापूर आल्यामुळे रेकॉर्ड खराब झाल्यामुळे ते उपलब्ध होत नाही. या सर्व कारणांचा विचार करता सन १९८२-८३ पूर्वीच्या अग्रीम रक्कम क्षमापित करण्याबाबतचा प्रस्ताव माननीय प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे सादर केला आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षात कोल्हापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (अनामत व तसलमात (अग्रिम) रकमाबाबत) आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर संदर्भात लेखापरिक्षकांनी लेखा आक्षेप उपस्थित केलेले आहेत.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून लेखी खुलासा कळविण्यात आला आहे की, सन २००९-२०१० मधील सण तसलमात (अग्रिम) रक्कम रुपये १,२५,०००/- वसूल करुन भरणा केलेली आहे. तशी नोंद तसलमात (अग्रिम रक्कम) नोंदवहीत घेण्यात आलेली आहे. सन १९६५-१९६६ ते १९८२ अखेर *८क * इतर तसलमात रक्कम रुपये ७५,६८७/- समायोजनचा प्रस्ताव अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे कार्यालयाकडे दिनांक २२ मे, २०१० रोजी सादर करण्यात आला होता. तथापि, त्यांनी प्रस्ताव

नामंजूर केलेला होता. त्यामुळे आता सन १९६५ ते २००३ अखेरच्या प्रलंबित रकमा रुपये १,०१,३९२.१०/- संबंधित कर्मचा-यांकडून वसुली करणेबाबतची कार्यवाही सुरू आहे. सदर रकमा कुटुंब कल्याण ट्युबॅक्टामी कॅम्पसाठी व इतर ऑपरेशन कॅम्पसाठी सार्वजनिक आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नावाने घेतलेल्या आहेत. परिच्छेदामध्ये नमूद कर्मचारी श्रीमती भिडे यांचे ६९ हप्त्यांपैकी ५० हप्ते वसूल झालेले आहेत. तसेच डॉ.श्रीमती माळवे यांचे ६० हप्त्यांपैकी १० हप्ते वसूल झालेले असून उर्वरित वसुलीची कार्यवाही सुरू आहे, याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रिम रक्कम देण्याचे अधिकार आहेत. एखाद्या प्रकरणामध्ये जेवढी रक्कम खर्च होईल त्या रकमेच्या ८० टक्केपर्यंत अग्रीम रक्कम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीनंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना अग्रीम रकमा देण्याचे अधिकार आहेत. याकरिता जो लेखाशीर्ष असतो त्या लेखाशीर्षावर खर्च करण्याची परवानगी दिली जाते, त्यासाठी ६० दिवसांच्या कालावधीमध्ये अग्रीम देयकाचा कालावधी सादर करावा लागतो. त्यानंतर अग्रीम रक्कम समाविष्ट (रिकन्सिल) करण्यात येते ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली.

**सन १९६५ ते २००३ या सुमारे ५० वर्षांच्या कालावधीतील आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूरकडील अनामत अग्रीम (तसलमात) रक्कम रुपये १,०१,३९२/- अद्याप प्रलंबित आहे. सदर रक्कम कुटुंब कल्याण कॅम्पसाठी सार्वजनिक आरोग्य अधिकारी (पब्लिक हेल्थ ऑफिसर), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे नावे देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत उपरोक्त रकमेपैकी रुपये २४,०५०/- एवढीच रक्कम वसुल करण्यात आली असून उर्वरित रक्कम रुपये ७७,३४२/- वसूल करण्यासंदर्भात कोणतीही विशेष कार्यवाही करण्यात आलेली नाही. या प्रकरणी सुमारे ५० वर्षांचा कालावधी उलटून गेलेला असतांनाही अग्रिमाची रक्कम वसूल करण्याबाबत तत्कालिन कोणत्याही अधिका-यांनी हेतुपूर्वक प्रयत्न केलेले असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व संबंधित अधिका-यांची चौकशी होणे आवश्यक आहे, कारण शासनाचा पैसा अनेक वर्षांपासून विनावापर अडकून पडलेला आहे. तसेच सन १९६५ ते १९८३ या कालावधीत एकूण किती अग्रीम रक्कम क्षमापित करण्यासाठी शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाला कळविण्यात आलेले आहे, याबाबतची माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

## लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणेबाबत

**(१) परिच्छेद क्रमांक ५.७२ (२)/१४ (सन २०१३-१४)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | ग्रामपंचायतीचे नाव | लेखापरीक्षणातील परिच्छेद क्रमांक व लेखापरीक्षण वर्ष | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २ | खर्च प्रमाणके लेखा परिक्षणांस उपलब्ध न झाले बाबत | कोल्हापूर | करवीर | वळीवडे | १४<br>सन २०१०-११ ते<br>सन २०११-१२ | १७,६९,७३९/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

रुपये १७,६९,७३९/- आक्षेपाधिन ठेवणेत आलेली आहे. परंतु सदर रकमेपैकी खालीलप्रमाणे रकमा ज्या-त्या प्राधिकरणाकडे वर्ग करणेत आलेल्या आहेत :—

| | |
|---|---|
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर | – १,१८,६००/- |
| पाणीपुरवठा व स्वच्छता | – ४,४७,८००/- |
| वीज बीले | – १७,३००/- |
| पाटबंधारे पाणी पट्टी | – ५,०००/- |
| जि.ग्रा.नि.कर्ज | – १,२२,४३१/- |
| ०.२५% जिल्हा परिषद वर्गणी | – ११,०६७/- |
| एकूण | – ७,२२,१९८/- |
| आक्षेपाधिन किर्दीस नमूद नसलेली रक्कम | – १,६९,२५०/- |
| पंचायत समितीकडून तपासणी अंती उपलब्ध प्रमाणके व बीले रक्कम रुपये | – ८,७८,२९१/- |
| एकंदर एकूण | १७,६९,७३९/- |

आता सदर प्रमाणकांची पडताळणी केली असून रक्कम रुपये १७,६९,७३९/- इतक्या रकमांची प्रमाणके दप्तरी ठेवणेत आली आहेत. तरी सदरचा खुलासा मान्य व्हावा, ही विनंती.

**(२) परिच्छेद क्रमांक ५.७२ (२)/१५ (सन २०१३-१४)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | ग्रामपंचायतीचे नाव | लेखापरीक्षणातील परिच्छेद क्रमांक व लेखापरीक्षण वर्ष | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २ | खर्च प्रमाणके लेखा परिक्षणांस उपलब्ध न झाले बाबत | कोल्हापूर | पन्हाळा | सातवे | १५<br>सन २०१०-११ ते<br>सन २०११-१२ | ७,९५,७७६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सन २०१०-११ व सन २०११-१२ या कालावधीत लेखापरिक्षणाच्या वेळी ७,९५,७७६/- रकमेची एकुण १४४ प्रमाणके उपलब्ध झालेली नव्हती. तथापि, आता सर्व १४४ प्रमाणके दप्तरी उपलब्ध आहेत. सदरच्या प्रमाणकांची पडताळणी विस्तार अधिकारी (पं) व गट विकास अधिकारी यांनी केलेली आहे.

(१) सदर १४४ प्रमाणकांपैकी ७० प्रमाणके (रक्कम रुपये ५,१३,७५१/-) ही ग्रामपंचायत सातवे, ता. पन्हाळा येथील असून तत्कालिन ग्रामसेवक, श्री. हंबीरराव गणपती निरुखे, सेवानिवृत्त यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे.

(२) उर्वरित प्रमाणकांपैकी ७४ प्रमाणके (रक्कम रुपये २,८२,०२५/-) ही ग्रामपंचायत सातवे, ता. पन्हाळा येथील असून तत्कालिन ग्रामसेवक श्री. एल.बी. जाधव सध्या कार्यरत पंचायत समिती, शाहूवाडी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहेत. ती दप्तरी उपलब्ध आहेत. उपरोक्त खुलासा अवलोकनीय करण्यात यावा, ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने परिच्छेद क्रमांक ५.७२ (२)/१४ व परिच्छेद क्रमांक ५.७२ (२)/१५ या परिच्छेदांमध्ये लेखापरिक्षणास अहवाल सादर करण्यात आलेले नाही. लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करणे याबाबत मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ प्रमाणे २५ हजार रुपये दंड, सेवापुस्तिकेमध्ये नोंद आणि एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा. तसेच अन्य परिच्छेदांबाबत योग्य ती कार्यवाही करुन समितीला एक महिन्यात अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

लेखापरिक्षणावेळी अभिलेखे सादर न केल्याप्रकरणी संबधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे. तसेच त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा गैरव्यवहार झालेला आहे आणि त्यामध्ये किती रक्कम गुतंलेली आहे, याबाबत सविस्तर चौकशी करुन वसुलीच्या कार्यवाहीसह मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये संबधिताविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामपंचायत वळीवडे, ता. करवीर, सन २०१०-११ ते सन २०११-१२ या वर्षामधील लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. १४ हा प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध न झालेबाबत आक्षेप घेणेत आला असून त्यामध्ये रक्कम रुपये १७,६९,७३९/- इतकी गुंतलेली आहे. सदर रक्कमेस तत्कालिन ग्रामसेवक श्री. बी.डी.पाटील हे जबाबदार आहेत. सदर प्रकरणी गटविकास अधिकारी यांनी चौकशी करून जा.क्र. पसक/पंचायत/ वशि-३/ ११०२/१८, दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी अहवाल सादर केलेला आहे. तो खालीलप्रमाणे :–

(१) सन २०१०-११ ते सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील देयक रू. १,१८,६००/- धनादेशाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरणा केले आहेत.

(२) महावितरण वीजबील रुपये १७,३००/- रक्कम धनादेशाने महावितरणकडे भरणा केली आहे.

(३) पाटबंधारे पाणीपट्टी रक्कम रुपये ५०००/- पंचायत समितीने अनुदानातून परस्पर कपात केली आहे.

(४) २५% जिल्हा ग्रामनिधी रक्कम रुपये ११,०६७/- ही रक्कम धनादेशाने जिल्हा परिषदेकडे भरणा केलेली आहे.

(५) जिल्हा ग्रामनिधी कर्ज रक्कम रुपये १,२२,४३१/- ही रक्कम धनादेशाने जिल्हा परिषदेकडे भरणा केलेली आहे.

(६) पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडे रक्कम रुपये ४,४७,८००/- धनादेशाने वर्ग केलेली आहे.

(७) रक्कम रुपये १,६९,२५०/- ही रक्कम लेखापरिक्षण कालावधीत खर्च झालेली नाही.

वरील १ ते ७ बाबींची बेरीज रु. ८,९१,४४८/- इतकी असून सदर वस्तुस्थिती बरोबर आहे. एकूण १७,६९,७३९/- पैकी अ.क्र. १ ते ७ ची एकूण रक्कम रुपये ८,९१,४४८/- वगळता उर्वरित शिल्लक रक्कम रुपये ८,७८,२९१/-ची बीले प्रमाणके त्यासंबंधीचे मुल्यांकने, साठा रजिस्टर, बल्ब स्टॅाक रजिस्टर इत्यादीचे उतारे प्रमाणकासोबत दप्तरी उपलब्ध आहेत. परिच्छेदांमधील सर्व बाबींची पुर्तता संबंधित ग्रामसेवक यांनी केलेली आहे.

तथापि, वरील सर्व अभिलेखे लेखापरिक्षणास दाखविणे गरजेचे होते तसे न केल्यामुळे त्यांच्या अनियमिततेबाबत व कर्तव्य कसुरीबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त अपिल) नियम, १९६४ यातील भाग तीन नियम ४ (१) नुसार श्री. बी.डी.पाटील, तत्कालिन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वळीवडे, ता.करवीर यांना सक्त ताकीद शास्ती देण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे प्रत्येक बाबीबाबत कार्यवाही पूर्ण झालेली असलेने त्याप्रमाणे सादर केलेला अहवाल अवलोकनी यावा.

ग्रामपंचायत सातवे, ता. पन्हाळा सन २०१०-११ ते सन २०११-१२ या कालावधीत लेखापरिक्षणाच्या वेळी ७,९५,७७६/- एवढ्या रक्कमेची १४४ प्रमाणके उपलब्ध नव्हती. सदर रकमेस तत्कालिन ग्रामसेवक श्री. हंबीरराव गणपती निरुखे (सेवानिवृत), एल.बी.जाधव, ग्रामसेवक हे जबाबदार आहेत. या प्रकरणाची चौकशी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा यांनी करून अहवाल सादर केलेला आहे. तो खालीप्रमाणे :—

सदर प्रकरणामधील एकूण १४४ प्रमाणकांपैकी रक्कम रुपये ५,१३,७५१/- ची ७० प्रमाणके श्री. हंबीरराव गणपती निरुखे यांनी उपलब्ध करून दिलेली आहेत.

(२) उर्वरित प्रमाणकांपैकी रक्कम रुपये २,८२,०२५/- ची ७४ प्रमाणके श्री. एल.बी.जाधव, ग्रामसेवक यांनी उपलब्ध करून दिलेली आहेत. सदर प्रकरणांमध्ये लेखापरिक्षणाचे वेळी अभिलेखे उपलब्ध करून देणेची जबाबदारी वरील दोन्ही तत्कालिन ग्रामसेवकांची होती. तथापि, त्यामध्ये कर्तव्यात कसुरी केलेली आहे. वरीलपैकी श्री. निरुखे सेवानिवृत आहेत त्यामुळे त्यांचेवर कारवाई केलेली नाही. श्री. एल. बी. जाधव त्यांचे कर्तव्य कसुरी बाबत त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ यातील भाग तीन नियम ४ नुसार त्यांना एक वेळ सक्त ताकीद शास्ती देणेत आली आहे. वरील प्रमाणे अभिलेखे उपलब्ध करून देणेची कार्यवाही झालेली असलेने अहवाल अवलोकनार्थ यावा.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न केल्याप्रकरणी काल ५० हजार रुपयांचा दंड प्रस्तावित केलेला आहे. या प्रकरणी मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये संबंधितांकडून दंडाची रक्कम वसूल केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी संबंधितांना ताकीद दिलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपण संबंधितांकडून २५ हजार रुपये दंड वसूल केला काय?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हे खरे आहे की, लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे सादर केली नव्हती. परंतु आता लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे. अन्य मुद्याच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, ज्या प्रकरणांमध्ये लेखापरीक्षण पूर्ण झालेले नाही त्या प्रकरणी संबंधितांकडून वसुली करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१३-२०१४ च्या स्थानिक निधी लेखापरिक्षणाच्या वेळी लेखापअक्षकांस ते तपासणी करीत असतांना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. अशा एकूण दोन परिच्छेदांमध्ये नोंदविलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५,०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करुन देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत.

समिती राज्यात अनेक शासकीय कार्यालयांना भेट देत असताना लेखापरिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिका-यांकडून वेळीच उपलब्ध करुन दिली जात नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, **"जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जास्त असणा-या रकमेइतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच संबंधितांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करुन तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तकामध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी"** अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रकमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करुन न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही, त्या प्रकरणांमध्ये दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. **कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये एकूण २ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्यावेळी सादर करण्यात आलेले नाहीत, अशा सन २०१३-२०१४ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करुन वसूल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल तसेच संबंधित जबाबदार ग्रामसेवकांच्या प्रकरणांबाबत दंडाची नोटीस देऊन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, कोल्हापूर

## सर्वसाधारण शिफारशी

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :—**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः कोल्हापूर जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ-मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचा-यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतुद करुन मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिका-यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणा-या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिका-यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुस-या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन कोल्हापूर जिल्हा परिषदेमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :—**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध**

**करुन देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणा-या अधिका-यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परिक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणा-या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रुपये २५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :—**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचा-याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोर्षीविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करुन नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करुन त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करुन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ५ सप्टेंबर २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(८) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(९) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१२) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्रीमती शौमिका महाडीक, अध्यक्षा, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(२) श्री. सर्जेराव पाटील, उपाध्यक्ष्य, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(३) श्री. अंबरिषसिंह घाटगे, सभापती, अर्थ व शिक्षण समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(४) श्रीमती वंदना मगदूम, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर

**स्थानिक निधी लेखा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. दि. बा. पाटील, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे**

(१) श्री. संभाजी लांगोरे, उपायुक्त (आस्थापना), आयुक्त कार्यालय, पुणे

(२) श्री. विलास जाधव, सहायक आयुक्त (विकास), आयुक्त कार्यालय, पुणे.

**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. रवि शिवदास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्रीमती सुषमा देसाई, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) विभाग

(५) श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. आर.बी. भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(७) श्रीमती प्रियदर्शनी मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. तुषार बुरूड, कार्यकारी अभियंता,(बांधकाम)

(९) डॉ. योगेश साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी

(११) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(१२) डॉ. एस.एम. शिंदे, पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१४) श्री. मारूती बसर्गेकर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१५) श्री. यशवंत थोरात, कार्यकारी अभियंता, जलसंधारण

(१६) श्री. भिमराव टोणपे, प्रतिनिधी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री. रविकांत अडसूळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्रीमती एस.जे.जाधव, प्रभारी उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१९) श्री. राहूल कदम, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(२०) श्री. बाळासाहेब वाघ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अजरा

(२१) श्रीमती माधुरी परीट, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड

(२२) श्री. रमेश जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड

(२३) श्रीमती सिमा जगताप, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज

(२४) श्रीमती उमा पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गगनबावडा

(२५) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले

(२६) डॉ. शबाना मोकाशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कागल

(२७) श्री. सचिन घाटगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर

(२८) श्री. तुलसीदास शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

(२९) श्री. उदय पाटील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी

(३०) श्री. अनिल वाघमारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी

(३१) डॉ. विजयसिंह जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालातील कोल्हापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ६ सप्टेंबर २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(३) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(४) डॉ सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(६) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(७) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(८) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री.किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रक सदस्य** :

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(४) श्री. आर.बी.भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विभाग

(५) श्री. प्रियदर्शनी मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(६) डॉ. योगेश साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. भिमराव टोणपे, प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(८) श्री. राहूल कदम, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) श्रीमती एस.जे.जाधव, प्रभारी उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. यशवंत थोरात, कार्यकारी, अभियंता, जलसंधारण

(११) डॉ. एस.एम.शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री. मारूती बसर्गेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१३) श्रीमती सुषमा देसाई, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(१४) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. रवि शिवदास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(१६) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. रविंद्र चौगले, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती

(१८) श्रीमती माधुरी परिट, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूदरगड

(१९) श्री. बाळासाहेब वाघ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा

(२०) श्री. रमेश जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड

(२१) श्रीमती सिमा जगताप, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज

(२२) श्रीमती उमा पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गगनबावडा

(२३) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले

(२४) डॉ. शबाना मोकाशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कागल

(२५) श्री. सचिन घाटगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर

(२६) श्री. तुलशीदास शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

(२७) श्री. उदय पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी

(२८) श्री. अनिल वाघमारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी

(२९) डॉ. विजयसिंह जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ.

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी २४७७—७ (४५०-३-२०२१)

**शुक्रवार, दिनांक ७ सप्टेंबर २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१०) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(११) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रत सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई :**

(१) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. दि. बा. पाटील, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. संभाजी लांगोरे, उपायुक्त (आस्थापना), आयुक्त कार्यालय, पुणे

(२) श्री. विलास जाधव, सहायक आयुक्त (विकास), आयुक्त कार्यालय, पुणे.

**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. रवि शिवदास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्रीमती सुषमा देसाई, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) विभाग

(५) श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. आर.बी. भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(७) श्रीमती प्रियदर्शनी मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. तुषार बुरूड, कार्यकारी अभियंता,(बांधकाम)

(९) डॉ. योगेश साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी

(११) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(१२) डॉ. एस.एम. शिंदे, पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१४) श्री. मारूती बसर्गेकर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१५) श्री. यशवंत थोरात, कार्यकारी अभियंता, जलसंधारण

(१६) श्री. भिमराव टोणपे, प्रतिनिधी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री. रविकांत अडसूळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्रीमती एस.जे.जाधव, प्रभारी उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१९) श्री. राहूल कदम, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(२०) श्री. बाळासाहेब वाघ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अजरा

(२१) श्रीमती माधुरी परीट, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड

(२२) श्री. रमेश जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड

(२३) श्रीमती सिमा जगताप, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज

(२४) श्रीमती उमा पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गगनबावडा

(२५) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले

(२६) डॉ. शबाना मोकाशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कागल

(२७) श्री. सचिन घाटगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर

(२८) श्री. तुलसीदास शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

(२९) श्री. उदय पाटी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी

(३०) श्री. अनिल वाघमारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी

(३१) डॉ. विजयसिंह जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१३-१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील कोल्हापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २४ जुलै २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उपसचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई,**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेयशिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

(६) श्री. अनिल डिग्रीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग

(७) श्री. पी. के. मिराजे, सहायक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

(८) श्री. म. रा. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(९) डॉ. व्ही. पी. भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

(१०) श्री. भा. ज. गाडेकर उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(११) डॉ. वसंत माने, अवर सचिव ग्रामविकास विभाग

(१२) श्री. एस.व्ही. गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१३) श्री. शरद यादव, कार्यसन अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१४) श्री. र. पु. इंगोले, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग

(१५) श्री. अ. म. पिंपरकर, श. श्रे.. १, पर्यावरण विभाग

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(२) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(३) श्री. संजय माने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(४) श्री. राजेंद्र भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(५) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(६) श्रीमती आशा उबाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(७) श्री. मनिष पवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(८) डॉ. वाय. आर. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(९) डॉ. विनोद पवार, पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(१०) श्री. समीर व्याघ्रांबरे, प्र. उद्यान अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका

**संक्षिप्त कार्यवृत :**

सन २०१३-१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सहायक सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उपसचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई,**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल
(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेयशिक्षण विभाग
(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग
(६) श्री. अनिल डिग्रीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग
(७) श्री. पी. के. मिराजे, सहायक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
(८) श्री. म. रा. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(९) डॉ. व्ही. पी. भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
(१०) श्री. भा. ज. गाडेकर, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग
(११) डॉ. वसंत माने, अवर सचिव ग्रामविकास विभाग
(१२) श्री. एस. व्ही. गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग
(१३) श्री. शरद यादव, कार्यसन अधिकारी, ग्रामविकास विभाग
(१४) श्री. र. पु. इंगोले, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग
(१५) श्री. अ. म. पिंपरकर, श. श्रे.. १, पर्यावरण विभाग

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(२) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(३) श्री. संजय माने, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर

(४) श्री. राजेंद्र भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(५) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(६) श्रीमती आशा उबाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(७) श्री. मनिष पवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(८) डॉ. वाय. आर. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(९) डॉ. विनोद पवार, पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(१०) श्री. समीर व्याघ्रांबरे, प्र. उद्यान अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका

**संक्षिप्त कार्यवृत :**

सन २०१३-१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सहायक सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांची साक्ष घेतली.

**बैठकीचे कार्यवृत्त**

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti) ची बैठक बुधवार, दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी ३-०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

**उपस्थिती :–**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :–**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने बैठकीत तिस-या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.